दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०४७ • पुणे • मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

आजी-माजी आमदारांसह सर्वपक्षीय नेत्यांनी राजकारण बाजूला ठेवून तालुक्याच्या विकासासाठी एकत्र येण्याची गरज

विकासाच्या प्रकल्पांमध्ये शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याची मागणी

पुरंदरचा विकास नेमका कुठपर्यंत?

घोषणांचा गाजावाजा, प्रत्यक्ष कामांचा हिशोब आणि दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांचे प्रश्न ऐरणीवर!

प्रश्न घोषणांचा नाही

पुरंदरचा विकास नेमका कुठपर्यंत पोहोचला आहे, याचे उत्तर आता केवळ प्रकल्पांच्या घोषणा, मंजूर निधीचे आकडे किंवा राजकीय दाव्यांतून मिळणार नाही. ते उत्तर गावागावांतील पाणीपुरवठ्याची स्थिती, शेतकऱ्यांच्या शेतात उपलब्ध असलेले पाणी, रस्त्यांची गुणवत्ता, आरोग्य व शिक्षणाच्या सुविधा आणि सामान्य नागरिकांच्या जीवनात झालेल्या बदलांतून मिळाले पाहिजे. पुरंदरचा विकास केवळ कागदोपत्री आणि घोषणांपुरता मर्यादित राहणार, की तो प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या शेतात पाणी, गावात दर्जेदार रस्ते आणि सामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणार? या प्रश्नाचे उत्तर आता आश्वासनांतून नव्हे, तर प्रत्यक्ष कामांतून मिळणे आवश्यक आहे.

पुरंदर तालुक्यात गेल्या काही वर्षांत रस्ते, पाणीपुरवठा, सिंचन, आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अनेक घोषणा करण्यात आल्या. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून तालुक्याचा चेहरामोहरा बदलण्याचे चित्र उभे केले जात असले, तरी या विकासाचा प्रत्यक्ष लाभ सामान्य नागरिक, शेतकरी आणि ग्रामीण भागातील जनतेपर्यंत किती पोहोचला, याचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याची वेळ आता आली आहे. विशेषतः सध्या निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीत विकासाच्या दाव्यांबरोबरच नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक झाले आहे.



पुरंदरच्या विकासासाठी एकत्रित कृती आराखडा हवा!

पुरंदरचा विकास हा केवळ राजकीय श्रेयाचा विषय न राहता तो जनतेच्या जीवनमानात सुधारणा घडविणारा ठरला पाहिजे. आजी-माजी लोकप्रतिनिधींनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून तालुक्यातील पाणी, शेती, रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर एकत्रित भूमिका घेणे आवश्यक आहे. प्रशासनानेही विकासकामांची सद्यस्थिती, निधीचा वापर, अपूर्ण प्रकल्प आणि दुष्काळसदृश परिस्थितीवरील उपाययोजनांचा वस्तुनिष्ठ अहवाल जनतेसमोर मांडावा. गावनिहाय पाणीपुरवठ्याचे नियोजन, शेतीसाठी उपलब्ध पाण्याचे व्यवस्थापन, ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती, आरोग्य सुविधांचे बळकटीकरण आणि रोजगारनिर्मिती यांना प्राधान्य दिले पाहिजे. तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी राजकीय इच्छाशक्ती, प्रशासकीय तत्परता आणि लोकसहभाग यांची सांगड घालणे गरजेचे आहे. विकासाच्या प्रत्येक निर्णयात सामान्य नागरिकांचे हित, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि ग्रामीण भागाच्या गरजा केंद्रस्थानी असल्या पाहिजेत.

स्वप्नील गायकवाड
विशेष शोधवार्ता

सासवड (दै. आरंभ पर्व)

पुरंदर तालुक्यातील विविध गावांमध्ये अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याच्या समस्या, अपूर्ण विकासकामे आणि पूर्ण झालेल्या कामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. काही भागांत पिण्याचे पाणी, शेतीसाठी सिंचन, आरोग्य सुविधा आणि दर्जेदार रस्ते या मूलभूत गरजांसाठी नागरिकांना अद्याप संघर्ष करावा लागत आहे.

विकासकामांसाठी निधी मंजूर झाल्याच्या घोषणा होतात; मात्र मंजूर निधीपैकी प्रत्यक्ष किती खर्च झाला, किती कामे पूर्ण झाली, कोणती कामे अपूर्ण आहेत आणि त्यातून नागरिकांना नेमका किती फायदा झाला, याची स्पष्ट माहिती जनतेसमोर येणे गरजेचे आहे. विकासाचा खरा मापदंड हा केवळ मंजूर निधी किंवा प्रकल्पांच्या घोषणांमध्ये नसून सामान्य नागरिकांच्या जीवनात झालेल्या सकारात्मक बदलांमध्ये असला पाहिजे.

पुरंदर तालुक्यातील शेतकरी पावसाची अनिश्चितता, पिकांचे संभाव्य नुकसान, पाण्याचे नियोजन, शेतीचा वाढता खर्च आणि बाजारपेठेतील चढ-उतार अशा अनेक समस्यांना सामोरे जात आहेत. अशा परिस्थितीत आजी-माजी आमदार, सर्वपक्षीय राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.

पाणीटंचाईग्रस्त गावांची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता, पीकनुकसानीचे पंचनामे, पात्र शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या बाबींवर तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी सर्व संबंधित विभागांचा समन्वय साधून ठोस कृती आराखडा तयार केला पाहिजे.

केवळ बैठका, घोषणा आणि आश्वासनांपुरते प्रशासन व लोकप्रतिनिधींचे काम मर्यादित राहता कामा नये. प्रत्यक्षात किती उपाययोजना करण्यात आल्या, त्याचा लाभ किती शेतकऱ्यांना मिळाला आणि कोणत्या समस्या अद्याप प्रलंबित आहेत, याचा नियमित आढावा घेतला पाहिजे. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना दिलासा देणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून लोकप्रतिनिधींचीही महत्त्वाची भूमिका आहे.

पुरंदरच्या विकासाची चर्चा होत असताना तालुक्यातील विविध प्रस्तावित आणि सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांच्या जमिनी, उपजीविका, पाणीवापर आणि भविष्यातील शेतीवर काय परिणाम होणार, याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. विकासाला विरोध हा मुख्य मुद्दा नसून विकासाची दिशा काय आहे, त्यातून निर्माण होणाऱ्या संधींचा लाभ कोणाला मिळणार आणि त्याची किंमत कोणाला मोजावी लागणार, हा खरा प्रश्न आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पांसाठी संपादित केल्या जात असतील, तर त्यांना योग्य मोबदला, पुनर्वसन, रोजगाराच्या संधी आणि पर्यायी उपजीविकेबाबत स्पष्टता असली पाहिजे. प्रकल्पांचे नियोजन करताना बाधित शेतकऱ्यांना विश्वासात घेणे, त्यांच्या हरकती व सूचना ऐकून घेणे आणि पर्यावरणीय तसेच सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी, पाण्याचे स्रोत आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होत असेल, तर त्या प्रश्नांची उत्तरेही संबंधित यंत्रणांनी दिली पाहिजेत. प्रकल्पांमधून निर्माण होणाऱ्या संधींचा लाभ स्थानिक नागरिकांना आणि शेतकऱ्यांना कसा मिळेल, याचे नियोजन आवश्यक आहे. विकासाचा फायदा संपूर्ण समाजाला मिळावा; मात्र त्यासाठी शेतकऱ्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष होता कामा नये.

ग्रामपंचायत ते तालुका स्तरापर्यंत विकासकामांसाठी मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च, कामांची गुणवत्ता, पूर्णत्वाची मुदत आणि देखभालीची जबाबदारी यांचा तपशील नागरिकांसाठी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अपूर्ण किंवा निकृष्ट कामांबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कार्यवाही केली पाहिजे.

विकासकामांच्या नियोजनापासून ते अंमलबजावणीपर्यंत नागरिकांचा सहभाग वाढविणे महत्त्वाचे आहे. ग्रामसभांमध्ये कामांचा आढावा घेणे, निधीच्या वापराबाबत पारदर्शकता राखणे आणि कामांच्या गुणवत्तेची तपासणी करणे यामुळे सार्वजनिक पैशांचा योग्य विनियोग होण्यास मदत होईल. विकासकामांचे सामाजिक लेखापरीक्षण नियमितपणे झाल्यास केवळ कागदोपत्री प्रगती दाखविण्याऐवजी प्रत्यक्ष परिस्थिती समोर येऊ शकेल. त्यामुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास वाढण्यासही मदत होईल.

पालिकेचे स्केटिंग मैदान समस्यांच्या विळख्यात

- युवा खेळाडूंचे भविष्य अंधारात
- सुरक्षा रक्षक ड्युटीवर मारतोय डुलकी
- विमाननगरकरांच्या तक्रारीला केराची टोपली
- सहायक आयुक्तांची तो मी नव्हेचची भूमिका
- पाण्याची टाकी असूनही पाण्यासाठी भटकंती,
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडणार का?



पुणे : निरंजन साळुंके (दै. आरंभ पर्व)

उच्चभ्रू सोसायटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विमाननगर परिसरात पालिका क्रीडा विभागाच्या वतीने उभारण्यात आलेले आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्केटिंग रिंग ग्राउंड हे विविध समस्यांच्या विळख्यात अडकल्याने युवा खेळाडूंचे भविष्य अंधारात राहिल्यामुळे भविष्यात स्केटिंग रिंग ग्राउंडची सुधारणा होणार का? असा मुख्य प्रश्न विमाननगरकरांना सतावत आहे. पूर्व हवेली भागातील कल्याणीनगर, कोरेगाव पार्क यानंतर विमाननगर परिसराकडे उच्चभ्रू सोसायटी म्हणून पाहिले जात आहे. परिसरात राज्यासह परराज्यातील नागरिक नोकरीच्या शोधार्थ स्थायिक झाले असले तरी पण येथील स्थानिक नागरिकांना इतर सुविधांसह परिसरातील भविष्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्केटिंग खेळाडू घडावेत या उद्देशाने पालिका क्रीडा विभाग व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या विशेष प्रयत्नातून जवळपास कोट्यवधी रुपये खर्च करून अंदाजे एक ते दिड एकरमध्ये सदरचे मैदान दहा ते पंधरा वर्षापूर्वी विमाननगर सारख्या उच्चभ्रू सोसायटीत उभारण्यात आले आहे. यापूर्वी पूर्व हवेली भागात सदरचे ग्राउंड नसल्याने युवा खेळाडूंना सराव करण्यासाठी शहराकडे जाण्याशिवाय पर्याय नसल्याने अनेक खेळाडूत नाराजीचे सूर उमटले होते. मात्र सध्या हे ग्राउंड उभारण्यात आल्याने विमाननगर परिसरासह धानोरी, विश्रांतवाडी, लोहगाव आदी पंचक्रोशीतील खेळाडू येथे सरावासाठी येत असतात.त्यातच खेळाडूंना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होण्याच्या उद्देशाने प्रशासनाच्या वतीने लाखो रुपये खर्च करून पिण्याच्या पाण्याची टाकीसह हातपंप देखील उभारण्यात आली आहे. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी व पालिका प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे असलेली पाण्याची टाकी ठणठणीत कोरडी असल्याने व असलेला हातपंप देखील मोडकळीस येऊन तो धुळखात पडल्यामुळे येथे सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंना आक्टोबर हिट मध्ये पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे याकरिता करण्यात आलेला खर्च पाण्यात गेला असल्याची म्हणण्याची वेळ विमाननगरकरावर आली आहे. यासह युवा खेळाडूंच्या सुरक्षिततेसाठी पालिका प्रशासनाच्या वतीने सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र येथील सत्य परिस्थिती पाहून असलेले सुरक्षा रक्षक हे नावालाच असल्याचे दिसून येत आहे. खेळाडूंचे रक्षण करणारच सुरक्षा रक्षक जर चक्क भर दुपारी कामावर डुलक्या मारायचे काम करत असतील तर येथे येणारे बाल खेळाडू खरोखरच सुरक्षित आहेत का? या संभ्रमात स्थानिक नागरिक पडले आहेत. त्यामुळे संबंधित ठेकेदारासह डुलक्या मारणाऱ्या सुरक्षा रक्षकावर योग्य ती कारवाई करून सदर ठेकेदारास काळया यादीत टाकण्याची मागणी स्थानिक जनतेकडून होत आहे. यासह येथे बसविण्यात आलेले सिमेंटचे गट्टू देखील उखडले गेल्याने परिसरात दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.यासह सुरक्षा रक्षकांना बनविण्यात आलेली कोठीच अंधारात व तिच्या खिडक्यांच्या काचा फुटलेल्या स्थितीत आहेत.त्यामुळे पालिका प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर येऊन पालिका प्रशासनाला सदर मैदानातून दोन रुपये मिळवण्याच्या उद्देशाने विद्युत फ्लेक्स लावण्यात आले आहे. मात्र त्याची देखील दुरावस्था होऊन असलेली परिस्थिती अतिशय बिकट असल्याचे निदर्शनास आले असताना येथील असलेल्या इमारतीमध्ये अनेक साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत पडून त्यावर गंज चढल्याने असलेले स्केटिंग ग्राउंड हे भंगाराचे आगार आहे का?असा संतप्त सवाल विमाननगर कारकडून उपस्थित केला जात आहे.तर परिसरात घाणीच्या साम्राज्यात देखील भर पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे येथे सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंचे आरोग्य धोक्यात आले आहे. तर बसवण्यात आलेले विद्युत पद्धतीने देखील फुटलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे पालिका प्रशासन खेळाडूंच्या आरोग्याशी खेळत असल्याने झोपी गेलेल्या पालिका प्रशासन अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधींना स्केटिंग मैदान दुरुस्ती करण्यास वेळ मिळणार का?हा मुख्य सवाल देखील यामुळे उपस्थित होऊन सदरचे मैदान दुरुस्तीकडे पालिका प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष केंद्रित करून ते सुधारावे अशी मागणी स्थानिक जनतेकडून होत आहे.

नुकत्याच दहा महिन्यापूर्वी झालेल्या पालिका निवडणुकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रभागाचा विकास करण्याचा दावा केला होता. पण येथील परिस्थिती पाहून हाच का? विमाननगर प्रभागाचा विकास हा मुख्य प्रश्न स्थानिक जनतेला सतावून निवडणूक काळात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेली विकासकामांची आश्वासने हवेत विरून ती फुसका बार ठरल्याचे येथील स्केटिंग मैदानावरून स्पष्ट जाणवत आहे.

तो मी नव्हेचची भूमिका

नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त संजय पोळ यांची प्रत्यक्ष भेट घेऊन संपर्क साधला असता ते म्हणाले की, स्केटिंग दुरुस्तीचे काम आमचे नसून तुम्ही पालिका क्रीडा विभागाशी संपर्क साधण्याचा सल्ला देऊन त्या विभाग अधिकाऱ्याचा माझ्याकडे नंबर नसल्याचे उत्तर मिळाल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो ३ नोव्हेंबर पासून रुळावर

मोदी करणार ऑनलाइन उद्घाटन

पुणे (दै. आरंभ पर्व)

वारंवारच्या विलंबानंतर हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो लाइन ३ ची प्रवासी सेवा ३ नोव्हेंबरपासून सुरू होण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मेट्रोला हिरवा झेंडा दाखवतील, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्घाटनासाठी प्रत्यक्ष उपस्थितराहणार आहेत. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता उठल्यानंतर पुढील दोन दिवसांत अधिकृत घोषणा होण्याची शक्यता एका वरिष्ठ अधिकाऱ्याने व्यक्त केली. सोमवारी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि प्रकल्प कंपनीच्या प्रतिनिधींमध्ये बैठक झाली. या बैठकीत मेट्रो मार्गाची सद्यस्थिती, कामाची तयारी आणि प्रवासी सेवा सुरू करण्यासाठी आवश्यक व्यवस्थांचा आढावा घेण्यात आला. ३ नोव्हेंबर ही सेवा सुरू करण्याची संभाव्य तारीख कायम ठेवण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.





निसर्गाचे रक्षण हीच शिवरायांना आदरांजली!

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

आज महाराष्ट्रात विकासाच्या नावाखाली मोठमोठे प्रकल्प उभे राहत आहेत. रस्ते, उद्योग, वीज प्रकल्प आणि पायाभूत सुविधांचा विस्तार होत आहे. विकास हा काळाची गरज आहे, यात दुमत नाही. मात्र, हा विकास नेमका कोणाच्या किमतीवर होत आहे, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. निसर्गाचा ऱ्हास करून साधलेला विकास खऱ्या अर्थाने प्रगती ठरू शकतो का? भीमाशंकरसह विविध ठिकाणी होणाऱ्या वृक्षतोडीच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आज प्रत्येक राजकीय व्यासपीठावर घेतले जाते. महाराजांचा जयजयकार केला जातो, त्यांच्या पराक्रमाच्या कथा सांगितल्या जातात आणि त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याची भाषा केली जाते. परंतु, महाराजांच्या विचारांचे खरे अनुकरण त्यांच्या नावाचा घोष करण्यात नसून त्यांच्या दूरदृष्टीचे आचरण करण्यात आहे. रयतेचे हित, नैसर्गिक साधनसंपत्तीचे महत्त्व आणि पर्यावरणाशी सुसंगत जीवनपद्धती यांचा विचार करणाऱ्या महाराजांच्या वारशाचा अभिमान बाळगणाऱ्यांनी निसर्गरक्षणालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. महाराजांच्या काळात आरमारासाठी लाकडाची आवश्यकता असतानाही आंबा, फणस यांसारख्या उपयोगी वृक्षांच्या तोडीबाबत काळजी घेण्याच्या सूचना दिल्याचे ऐतिहासिक संदर्भात नमूद केले जाते. यातून तत्कालीन परिस्थितीतही वृक्षसंपत्तीचे महत्त्व ओळखण्याची दूरदृष्टी दिसून येते. मग आज आधुनिक तंत्रज्ञान, विज्ञान आणि पर्यावरणविषयक जागरूकता असूनही आपण वृक्षतोडीबाबत इतके बेफिकीर का आहोत? शिवरायांच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी या प्रश्नाचे उत्तर आत्मपरीक्षणातून शोधले पाहिजे.

भीमाशंकरसारखा जैवविविधतेने समृद्ध परिसर हा केवळ पर्यटनाचे किंवा विकास प्रकल्पांचे ठिकाण नाही. तो असंख्य वनस्पती, पक्षी, प्राणी, कीटक आणि सूक्ष्मजीवांचे अधिवासस्थान आहे. सह्याद्रीच्या पर्यावरणीय संतुलनात अशा वनक्षेत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या परिसरातील वृक्षतोड म्हणजे केवळ काही झाडे कमी होणे नव्हे, तर संपूर्ण परिसंस्थेच्या संतुलनाला धक्का बसण्याची शक्यता आहे. आज हवामान बदल, वाढते तापमान, पाणीटंचाई, अनियमित पाऊस आणि जैवविविधतेचा ऱ्हास या समस्यांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे. झाडे कार्बन शोषून घेण्यास, मातीची धूप रोखण्यास, पाण्याचे चक्र टिकवून ठेवण्यास आणि असंख्य जीवांना आश्रय देण्यास मदत करतात. अशा परिस्थितीत वर्षानुवर्षे वाढलेल्या वृक्षांची तोड करून पर्यावरणीय नुकसान भरून काढण्याचा दावा करणे कितपत योग्य आहे, याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. टोरेंट कंपनीच्या प्रकल्पाच्या संदर्भात वन विभागाला तिप्पट जागा उपलब्ध करून देणे, तसेच सरकारकडून ६० हजार आणि कंपनीकडून ९० हजार झाडे लावण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचा उल्लेख केला जात आहे. या दाव्यांचा आणि संबंधित योजनांचा अधिकृत तपशील तपासणे आवश्यक असले, तरी एक मूलभूत प्रश्न कायम राहतो—वर्षानुवर्षे वाढलेल्या वृक्षांची जागा नवीन रोपे तातडीने घेऊ शकतात का?

एखाद्या जुन्या वृक्षाची उंची, त्याची विस्तीर्ण सावली, कार्बन साठवण्याची क्षमता आणि त्यावर अवलंबून असलेली जैवविविधता एका नव्या रोपात लगेच निर्माण होत नाही. रोपे लावणे ही चांगली गोष्ट आहे; पण ती जगवणे, त्यांची वाढ सुनिश्चित करणे आणि त्यांच्याभोवतीची परिसंस्था टिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे वृक्षारोपणाच्या आकड्यांपेक्षा वृक्षसंवर्धनाचे प्रत्यक्ष परिणाम तपासले गेले पाहिजेत. सुमारे ३० ते ४० हजार वृक्ष तोडण्याचा उल्लेख होत असेल, तर या निर्णयामागील कारणे, पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास, पर्यायी जागांचा विचार आणि वृक्षतोड टाळण्यासाठी केलेले प्रयत्न यांची माहिती जनतेसमोर पारदर्शकपणे मांडली गेली पाहिजे. कारण प्रत्येक वृक्ष हा असंख्य जीवांच्या जगण्याशी जोडलेला असतो.

झाडांवर घरटी बांधणारे पक्षी, त्यांच्यावर अवलंबून असणारे कीटक, जंगलात आश्रय घेणारे प्राणी आणि त्या संपूर्ण परिसंस्थेवर अवलंबून असलेले असंख्य जीव यांचाही विचार केला पाहिजे. विकास प्रकल्पांसाठी झाडे तोडण्याचा निर्णय घेताना केवळ आर्थिक लाभ, प्रकल्पाचा वेग किंवा तात्कालिक गरज यांचाच विचार पुरेसा ठरत नाही. पर्यावरणीय परिणामांचा सखोल अभ्यास, स्थानिक नागरिकांचे मत, वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण आणि पर्यायी उपायांची व्यवहार्यता यांनाही समान महत्त्व दिले पाहिजे. शक्य असेल तेथे प्रकल्पांचे नियोजन बदलून वृक्षतोड टाळणे, संवेदनशील वनक्षेत्रांचे संरक्षण करणे आणि पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचेल असे पर्याय स्वीकारणे आवश्यक आहे.

व्यसनमुक्त भारताचा संकल्प; कै. बंडोजी खंडोजी चव्हाण विद्यालयात युवा मेळावा व पारंपरिक क्रीडा दिन उत्साहात

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा सहभाग; विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संदेश

पुणे (दै. आरंभ पर्व)

धारेश्वर विद्या व क्रीडा प्रतिष्ठान संचलित कै. बंडोजी खंडोजी चव्हाण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी 'नशामुक्त युवा, विकसित भारत – १०० दिवस संकल्प' या अभियानांतर्गत युवा मेळावा व पारंपरिक क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित या उपक्रमात स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, संचालक अनिकेत चव्हाण, संस्थेचे सल्लागार गोपाळ विद्यासागर,विद्यालयाचे प्राचार्य विलास खाडे,विभागप्रमुख तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे पुणे जिल्हा समन्वयक मदन सूर्यवंशी यांच्यासह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आत्मनिर्भर व्यसनमुक्ती केंद्राचे संस्थापक सुभाष हगवणे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत व्यसनमुक्त भारत या विषयावर मार्गदर्शन केले. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, तसेच शिक्षण, क्रीडा आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. व्यसनमुक्त सल्लागार श्री. संजय रायगुले यांनी विद्यार्थ्यांना व्यसनाधीनतेविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख मदन सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन तृप्ती नेब यांनी केले, तर स्नेहप्रभा सूर्यवंशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. व्यसनमुक्त युवा घडविणे, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे आणि पारंपरिक खेळांच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व पटवून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

स्वतंत्र दिवाणी न्यायालय स्थापन करण्यासाठी अमरराजे निंबाळकर यांचे निवेदन

वैराग (दै. आरंभ पर्व) : सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील वैराग येथे स्वतंत्र दिवाणी न्यायालय (कोर्ट) स्थापन करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अमरराजे निंबाळकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. वैराग व वैराग भागातील महत्त्वाचे गाव असून वैराग व आसपासच्या अनेक गावांतील नागरिकांना विविध दिवाणी स्वरूपाच्या न्यायालयीन कामकाजासाठी प्रवास करावा लागतो. यामुळे नागरिकांचा वेळ, आर्थिक खर्च आणि दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वैराग येथे स्वतंत्र दिवाणी न्यायालय स्थापन झाल्यास वैराग व वैराग भागातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी अधिक सुलभ सुविधा उपलब्ध होतील. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळविण्याची प्रक्रिया अधिक सोयीची होईल. तसेच नागरिकांचा प्रवासाचा वेळ आणि आर्थिक खर्च कमी होण्यास मदत होईल. भारतीय संविधानातील न्यायप्रवेशाच्या तत्त्वांचा विचार करून तसेच संबंधित न्यायालयीन प्रशासनाची मान्यता, उपलब्ध प्रकरणांची संख्या, भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या आणि आवश्यक पायाभूत सुविधांचा अभ्यास करून वैराग येथे स्वतंत्र दिवाणी न्यायालय स्थापन करण्याच्या प्रस्तावावर सकारात्मक कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती निवेदनातून करण्यात आली आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



चारशे पन्नास दृष्टीबाधितांना दिवाळी शिधा वाटप

- द पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशन स्तुत्य उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : दृष्टीबाधितांची दिवाळी आनंदात जावी यासाठी द पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशन आणि रोटरी क्लब ऑफ पुणे शनिवार वाडा यांच्या संयुक्त विद्यमाने ४५० दृष्टीबाधित व्यक्तींना दिवाळी शिधा वाटप करण्यात आले. नांदेड फाटा, सिंहगड रस्ता येथील शिर्डी साईबाबा अंध महिला वृद्धाश्रमात रविवारी (दि.२५ ऑक्टोबर) हा कार्यक्रम झाला. यामध्ये पुणे शहर व परिसरातील दृष्टीबाधित व्यक्ती व त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले होते. याप्रसंगी द पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेश शहा, कार्यकारी संचालक परवेझ बिलीमोरिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच रोटरी क्लबचे प्रेसिडेंट दिनेश जोशी, प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीनिवास पाळंदे, नारायण चांडक, अभिनव सेवा फाउंडेशनचे सुनील गोवर्धन आदी उपस्थित होते. काश्मिरा ठाकर व सहकाऱ्यांनी आयोजन केले. द पूना ब्लाईंड मेन्स असोसिएशन ही संस्था १९५२ पासून दृष्टीबाधितांच्या कल्याणासाठी कार्यरत असून, गेली अनेक वर्षे दिवाळी शिधा वाटपाचा उपक्रम नियमितपणे राबविला जात आहे.

- कृतीतून घेतले स्वयंरोजगाराचे धडे!
- वडगाव खुर्द येथील मनपा शाळेचा अभिनव उपक्रम
- विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला मिळाली व्यावसायिक शिक्षणाची जोड

विद्यार्थ्यांनी बनवले सुगंधी उटणे



आमच्या शाळेतील प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे कौशल्यपूरक उपक्रम राबविले जातात. चौथीच्या मुलांनी सुगंधी उटणे यासोबतच केमिकल विरहित अगरबत्ती यावर्षी सौ श्रद्धा नाडकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बनविली आहे.
- सौ सविता मानकर, मुख्याध्यापिका, मनपा शाळा क्रमांक २०४ बी

वडगाव खुर्द (दै. आरंभ पर्व)

शिक्षण म्हणजे केवळ लिहिणे-वाचणे नसून विद्यार्थ्यांमध्ये आत्मनिर्भरता, सर्जनशीलता आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करणे होय. याच उद्देशाने कै. नारायणराव नवले प्राथमिक विद्यालय, मनपा शाळा क्रमांक २०४ बी, वडगाव खुर्द येथील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सुगंधी उटणे तयार करण्याचा अभिनव उपक्रम राबविला. वर्गशिक्षिका सौ. श्रद्धा नाडकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी उटणे तयार करण्यासह त्याचे पॅकिंग करण्याचाही अनुभव घेतला.

दिवाळी आणि थंडीच्या दिवसांत उटण्याचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना विविध औषधी वनस्पतींची माहिती देण्यात आली. त्यांची नावे, गुणधर्म आणि त्वचेच्या निगेसाठी होणारे उपयोग याविषयी सौ. नाडकर्णी यांनी मार्गदर्शन केले. विविध घटकांचे एकत्रीकरण करून उटणे तयार करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवली.

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा आणि अभ्यासासोबतच भविष्यात घरगुती उद्योग सुरू करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने गेल्या दोन वर्षांपासून दिवाळीपूर्वी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सौ. श्रद्धा नाडकर्णी यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या उटण्याच्या पुड्यांच्या विक्रीसाठी स्टॉल लावण्यात येणार आहे.

या उपक्रमात विद्यार्थिनी शुभ्रा बुचडे हिने मैत्रिणी हिरण्या, श्रुती, श्रावणी, रितिका आणि आराध्या यांच्या मदतीने उटण्याच्या पुड्यांमधून कल्पकतेने 'उटणे' हा शब्द साकारला. पालक सौ. रेश्मा सुनील थोरात यांनी विद्यार्थ्यांमध्ये होत असलेल्या सकारात्मक बदलांबद्दल समाधान व्यक्त केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सविता मानकर, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी सुरेश उचाळे, पर्यवेक्षिका सौ. नंदा डोळस, नगरसेविका तथा शिक्षण समितीच्या सदस्या सौ. कोमलताई नवले आणि सहकारी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व सौ. श्रद्धा नाडकर्णी यांचे कौतुक केले.

'मंगल रंग'मधून श्रीराम-सीतेच्या दिव्य प्रेमाची अनुभूती

मुंबई (दै. आरंभ पर्व)

नमित मल्होत्रा यांच्या बहुचर्चित 'रामायणम्' चित्रपटातील 'मंगल रंग' हे नवे गाणे प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. भगवान श्रीराम आणि माता सीता यांच्या दिव्य प्रेमाची, पवित्र नात्याची आणि भावपूर्ण जीवनप्रवासाची झलक या गाण्यातून पाहायला मिळते. निसर्गरम्य दृश्ये, भव्य राजवाडे, विवाहसोहळ्याचे मंगलमय वातावरण आणि वनवासातील भावस्पर्शी क्षण यांची सुंदर सांगड या गाण्यात घालण्यात आली आहे. या गाण्यात रणबीर कपूर भगवान श्रीराम, तर साई पल्लवी माता सीतेच्या भूमिकेत दिसत आहेत. या दोघांच्या नात्यातील प्रेम, समर्पण आणि भावनिक जवळीक विविध दृश्यांतून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. महाकाव्याच्या भव्य विश्वाची अनुभूती देतानाच प्रेक्षकांना श्रीराम आणि सीता यांच्या नात्याचे भावनिक पैलू अनुभवण्याची संधी या गाण्यातून मिळते. 'मंगल रंग' हे गाणे टी-सीरिजच्या अधिकृत यूट्यूब चॅनल 'वर्ल्ड ऑफ रामायणम्'वर उपलब्ध करण्यात आले आहे. हिंदी, तमिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम अशा पाच भाषांमध्ये हे गाणे एकाच वेळी प्रदर्शित झाले आहे. त्यामुळे विविध भाषांतील प्रेक्षकांना आपल्या भाषेत या संगीतमय सादरीकरणाचा आनंद घेता येणार आहे. गाण्यामध्ये श्रीराम आणि माता सीता यांच्या जीवनातील विविध महत्त्वपूर्ण क्षण उलगडण्यात आले आहेत. राजवाड्याची भव्यता, विवाहसोहळ्याचे पावित्र्य आणि अयोध्येपासून दूर वनवासात घालवलेले क्षण अशा प्रसंगांमधून त्यांच्या नात्याचे विविध पैलू समोर येतात.



सात वर्षांनंतरही लोहगाव विकासापासून कोरडेच; विकासाची पाटी अद्याप कोरीच!

समस्यांचा जनता वाचतेय पाढा; महापालिकेत असून अडचण, नसून खोळंबा!

- पाणीटंचाई, खड्डेमय रस्ते, बंद पथदिवे आणि सांडपाण्याच्या समस्यांनी नागरिक हैराण
- कोट्यवधींच्या पाणी योजनेनंतरही टँकरसाठी हजारो रुपये मोजण्याची वेळ



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे महापालिकेत समावेश होऊन सात वर्षांचा कालावधी उलटल्याचा उल्लेख होत असतानाही लोहगाव परिसरातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र समोर येत आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई, खड्डेमय रस्ते, बंद पथदिवे, अपुरी ड्रेनेज व्यवस्था आणि अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. महापालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत असून, महापालिकेत समावेश होऊनही लोहगावचा विकास नेमका कधी होणार? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. लोहगाव परिसराचा महापालिकेत समावेश होण्यापूर्वी या भागाचा कारभार ग्रामपंचायतीमार्फत चालविला जात होता. सुमारे चौदा ते पंधरा वाड्या-वस्त्यांचा समावेश असलेल्या या गावात लोकसंख्या वाढत असताना मूलभूत सुविधांची गरजही वाढत गेली. महापालिकेत समावेश झाल्यानंतर पाणीपुरवठा, रस्ते, पथदिवे आणि सांडपाणी व्यवस्थापनाच्या समस्या सुटतील, अशी नागरिकांना अपेक्षा होती.

लोहगाव परिसरातील पठारे वस्ती, हरणतळे, राखपसारे वस्ती आदी उत्तरेकडील भागाचा प्रभाग क्रमांक एक, धानोरी-लोहगावमध्ये, तर दादाची पदळ, खांदवेनगर, गुरुद्वारा परिसराचा विमाननगर प्रभाग क्रमांक तीनमध्ये समावेश करण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र या भागांतील नागरिकांच्या मूलभूत समस्या अद्याप कायम असल्याची तक्रार आहे. लोहगाव परिसरातील अनेक वाड्या-वस्त्यांना वर्षभर पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत असून काही भागांत खासगी टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ येत आहे.

पाणीटंचाई दूर करण्यासाठी महापालिका प्रशासनाने भामा-आसखेड धरणातून पाणीपुरवठा करण्याची योजना राबविली. या योजनेवर कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र या योजनेचा अपेक्षित लाभ सर्व वाड्या-वस्त्यांपर्यंत पोहोचला नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पिण्याच्या पाण्याचा एक टँकर मिळविण्यासाठी नागरिकांना एक हजार ते दीड हजार रुपये मोजावे लागत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही नागरिकांना खासगी टँकरसाठी पैसे खर्च करावे लागत असतील, तर या योजनेचा प्रत्यक्ष फायदा कोणाला झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

लोहगाव परिसरातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. हरणतळे, वडगाव शिंदे आणि वाघोलीकडे जाणाऱ्या काही रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र वर्ष ते दीड वर्षाच्या कालावधीतच हे रस्ते पुन्हा उखडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रस्त्यांवरील खड्डे, राडारोडा आणि अपुरी देखभाल यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. काही वाहनचालकांना अपघातांमध्ये गंभीर दुखापती झाल्याचेही स्थानिकांकडून सांगण्यात येते. त्यामुळे रस्त्यांच्या कामांची गुणवत्ता, वापरण्यात आलेला निधी आणि संबंधित ठेकेदारांची जबाबदारी यांची चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. महापालिकेच्या विद्युत विभागाच्या कार्यपद्धतीबाबतही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. अनेक वाड्या-वस्त्यांमधील पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी रस्त्यांवर अंधार पसरतो. आधीच खराब झालेल्या रस्त्यांवर पथदिवे बंद असल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्त्यांची दुरवस्था आणि अपुरी प्रकाशव्यवस्था यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याने प्रशासनाने तातडीने पथदिव्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

लोहगावच्या दोन प्रभागांत मिळून सत्ताधारी पक्षाचे सात आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा एक असे आठ नगरसेवक कार्यरत असल्याचा उल्लेख स्थानिक पातळीवरील राजकीय चर्चेत करण्यात येतो. मात्र एवढे लोकप्रतिनिधी असूनही मूलभूत प्रश्न सुटले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

महापालिकेच्या माध्यमातून विकासकामांसाठी निधी उपलब्ध होत असताना प्रत्यक्ष कामांची गुणवत्ता आणि अंमलबजावणी याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या समस्या गांभीर्याने घेऊन त्यावर कालबद्ध उपाययोजना करणे आवश्यक आहे. 'गड्या, आपला गावच बरा!' असे म्हणण्याची वेळ नागरिकांवर आल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे. महापालिकेत समावेश झाल्यानंतर विकासाला गती मिळण्याऐवजी नागरिकांच्या अडचणी कायम राहिल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

लोहगावचा विकास केवळ राजकीय आश्वासनांचा विषय न राहता प्रत्यक्ष नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडविणारा ठरला पाहिजे. पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा, दर्जेदार रस्ते, कार्यरत पथदिवे, सक्षम ड्रेनेज व्यवस्था आणि स्वच्छता या मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याची गरज आहे.

महापालिका प्रशासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी समन्वय साधून प्रलंबित कामांचा आढावा घ्यावा. मंजूर निधी, खर्च, पूर्ण झालेली कामे आणि अपूर्ण प्रकल्पांची माहिती नागरिकांसमोर मांडावी. विकासकामांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित केल्यास नागरिकांच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना होऊ शकतील.

लोहगावकरांचा प्रश्न एकच आहे—महापालिकेत समावेश होऊनही मूलभूत सुविधांसाठी आणखी किती वर्षे प्रतीक्षा करावी लागणार? रस्त्यांची दुरुस्ती, नियमित पाणीपुरवठा, पथदिवे आणि ड्रेनेज व्यवस्था यांसारख्या मूलभूत समस्यांवर ठोस उपाययोजना झालेल्या नसल्याचा नागरिकांचा आरोप आहे. निवडणुकीत दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरली नसल्याने मतदारांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. स्थानिक समस्यांची जाण असलेल्या नेतृत्वाऐवजी बाहेरून आलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिल्यामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याची चर्चाही ग्रामस्थांमध्ये आहे. निवडणुकीपुरती आश्वासने देणाऱ्या नेत्यांनी आता प्रत्यक्ष कामांचा हिशेब द्यावा, अशी अपेक्षा लोहगावकर व्यक्त करत आहेत.

ड्रेनेज व्यवस्थेअभावी रस्त्यांना तळ्याचे स्वरूप

लोहगाव परिसरातील अनेक भागांत सांडपाणी वाहून नेण्यासाठी आवश्यक ड्रेनेज व्यवस्था अपुरी असल्याची तक्रार आहे. घरगुती सांडपाणी तसेच पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने काही रस्त्यांवर पाणी साचते. त्यामुळे पादचाऱ्यांना साचलेल्या पाण्यातून मार्ग काढावा लागतो. काही सोसायट्यांमधून सांडपाणी उघड्यावर सोडले जात असल्याने परिसरात अस्वच्छता निर्माण होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांचे प्रमाण वाढून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

निवडणुकीतील आश्वासने हवेतच विरली का?

महापालिका निवडणुकीच्या काळात विविध राजकीय पक्षांतील इच्छुक उमेदवार आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी लोहगावच्या विकासाला प्राधान्य देण्याची आश्वासने दिली होती. मात्र निवडणुकीनंतर दहा महिन्यांचा कालावधी उलटल्याचा उल्लेख करत नागरिकांनी विकासकामांच्या प्रगतीबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६
३



जुन्नरमध्ये एकल महिला मेळावा उत्साहात

३५० महिलांची उपस्थिती | शासनाच्या विविध योजनांची माहिती; एकल महिलांसाठी स्वतंत्र ग्रुपची स्थापना

जुन्नर (दै. आरंभ पर्व)

श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुपच्या वतीने आणि श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशीलदादा शेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली जुन्नर येथे एकल महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात जुन्नर तालुक्यासह परिसरातील सुमारे ३५० महिलांनी नावनोंदणीसाठी उपस्थिती दर्शवली. विधवा, निराधार, परित्यक्ता, घटस्फोटित तसेच वयाची चाळिशी ओलांडूनही विवाह न झालेल्या आणि पतीकडून सांभाळ केला जात नसलेल्या महिलांना एकत्र आणून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, हा या मेळाव्याचा प्रमुख उद्देश होता.



यावेळी एकल महिलांची नावनोंदणी, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती आणि महिलांना भेडसावणाऱ्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. काही महिलांच्या मुलांचे वय २१ वर्षे झाल्यामुळे संजय गांधी निराधार अनुदान योजना किंवा श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेचा लाभ बंद झाल्याच्या समस्येकडेही लक्ष वेधण्यात आले. अशा महिलांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांसाठी सामूहिकपणे पाठपुरावा करण्याच्या उद्देशाने श्री राधेश्याम एकल महिला ग्रुप महाराष्ट्र राज्य या ग्रुपची स्थापना करण्यात आली. या ग्रुपच्या अध्यक्षस्थानी राज्य महिला अध्यक्षा सीमाताई सुरूसे (वाशीम जिल्हा) यांची नियुक्ती करण्यात आली. मेळाव्यात उपस्थित महिलांनी आपल्या अडचणी आणि समस्या मांडल्या. यावेळी एकल महिलांना आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक आधार मिळावा, यासाठी शासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या.

महिलांच्या उत्पन्न दाखल्यासाठी असलेली २१ हजार रुपयांची वार्षिक उत्पन्नाची अट रद्द करून ती एक लाख रुपये करावी, एकल महिलांच्या मुलांना शासकीय तसेच खासगी शाळा-महाविद्यालयांमध्ये शिक्षण शुल्क माफ करावे, भूमिहीन व बेघर महिलांना गावात किंवा नगरपालिका हद्दीत एक गुंठा जागा उपलब्ध करून घरकुल बांधून द्यावे, अशा मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. महिलांना गावातच स्वयंरोजगारासाठी जागा, व्यवसायाचे प्रशिक्षण आणि उद्योग सुरू करण्यासाठी अनुदान मिळावे, बालसंगोपन योजनेचे अनुदान दरमहा नियमित मिळावे, तसेच संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पेन्शन दरमहा सहा हजार रुपये करावी आणि अनुदान दर महिन्याच्या ५ तारखेला लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावे, अशी मागणीही करण्यात आली. एकल महिलांनी बचत गट स्थापन करावेत, प्रत्येक गावातील महिलांनी एकत्र येऊन स्वतंत्र ग्रुप तयार करावा आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मान्यवरांनी केले. मेळाव्यात विविध मान्यवरांनी महिलांचे मनोगत ऐकून घेत त्यांच्या अडचणींची दखल घेतली. महिलांच्या समस्या संबंधित शासकीय यंत्रणांपर्यंत पोहोचवून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन यावेळी देण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष अरुण शेरकर यांनी महिलांनी जास्तीत जास्त संख्येने नावनोंदणी करून शासनाच्या विविध योजनांची माहिती घ्यावी आणि पात्रतेनुसार योजनांचा लाभ मिळवावा, असे आवाहन केले.

संस्थापक अध्यक्ष दीपक चव्हाण यांनी मेळाव्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे सांगितले. मेळाव्यात सुमारे ३५० महिलांनी नावनोंदणीसाठी उपस्थिती दर्शवली असून संस्थेच्या कार्यालयातही अनेक महिलांची नावनोंदणी करण्यात आली आहे. अद्याप नावनोंदणी न केलेल्या एकल महिलांनी संस्थेशी संपर्क साधून आपली नोंदणी करावी आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. एकल महिलांना संघटित करून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे, आर्थिक स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी शासनदरबारी पाठपुरावा करणे, हा या मेळाव्याचा मुख्य हेतू असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

मान्यवरांची उपस्थिती

या मेळाव्याला श्री राधेश्याम दिव्यांग सशक्तीकरण केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष दीपक चव्हाण, राज्य महिला अध्यक्षा सीमाताई सुरूसे, अध्यक्ष अरुण शेरकर, डिसेंट फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र भाऊ बिडवई, बाबासाहेब मेमाणे, जनसंपर्क अधिकारी तसेच संजय गांधी तहसील कार्यालयाच्या अधिकारी ज्योती पर्हाड मॅडम, महिला अध्यक्षा नफिसाताई इनामदार, रजनी शहा, उपाध्यक्षा शम्मीम सय्यद, गायत्री गिरी, शुभांगी तोडकर, प्रतिभा वस्ते, लोकसेवा केंद्राचे मिलिंद खरात, सामाजिक कार्यकर्ते के. डी. अण्णा सरवदे, वंदना वाघचौरे, उषाताई तेलोरे, तुळसा हाडवले, जमिला शेख, रत्नाताई वाडेकर, ललिता शिराळशेठ, हरी नायकोडी, केरभाऊ नायकोडी, विजय शेळके, सौरभ मातेले, सुनील जंगम, शुभांगी लांडे, साहिल चव्हाण, ओम कार्तिक चव्हाण यांच्यासह जुन्नर तालुक्यातील महिला व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



श्री काशी विश्वेश्वर मंदिरात काकड आरती सोहळा

- पुढील महिनाभर पहाटे भक्तिमय कार्यक्रम
- पंचक्रोशीतील मंदिरांमध्येही काकड आरतीला भाविकांचा प्रतिसाद

येणेरे (आरंभ पर्व) : कार्तिक मासानिमित्त येणेरे येथील श्री काशी विश्वेश्वर मंदिरात पारंपरिक काकड आरती सोहळ्याला मोठ्या भक्तिभावाने सुरुवात झाली आहे. पहाटेच्या प्रसन्न वातावरणात होणाऱ्या या काकड आरतीसाठी मंदिरात मोठ्या संख्येने भाविक भक्त उपस्थित राहत असून, परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. हिंदू धर्मपरंपरेत कार्तिक महिन्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. या महिन्यात पहाटे लवकर उठून देवदर्शन घेणे, काकड आरती करणे, भजन-कीर्तनात सहभागी होणे आणि ईश्वराचे नामस्मरण करणे यांना विशेष महत्त्व दिले जाते. याच धार्मिक परंपरेचे जतन करण्याच्या उद्देशाने येणेरे येथील श्री काशी विश्वेश्वर मंदिरात काकड आरती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याबाबत ह. भ. प. श्री अशोक महाराज ढोले यांनी माहिती देताना, पुढील एक महिना हा काकड आरती सोहळा भक्तिभावाने पार पडणार असल्याचे सांगितले. या काळात भाविकांना पहाटेच्या आरतीत सहभागी होऊन श्री काशी विश्वेश्वराचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे.



शी टेल्स मधून महिलांच्या सक्षमीकरणाच्या प्रेरणादायी कथा

पुणे (आरंभ पर्व) : हर वर्ड इंडिया व अर्हम फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, शी टेल्स महिलांच्या सक्षमीकरणाच्या कथा हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. २३ ऑक्टोबर) पुण्यात उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांनी आपले अनुभव, चिकाटी व नेतृत्वाच्या कथा येथे मांडल्या. अर्थपूर्ण संवाद आणि अनुभवांच्या आदान-प्रदानासाठी व्यासपीठ निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. महिलांच्या धैर्य व कर्तृत्वाचा उत्सव आहे. प्रत्येक महिलेचा प्रवास पुढच्या पिढीला प्रेरणा देणारा असतो. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. शर्मिला बापट, माजी संचालक ब्रीक एनसीसीएस उपस्थित होत्या. तर सन्माननीय अतिथी म्हणून पवनीत कौर, आयएएस, अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा व डॉ. पारुल गंजू, सह-संस्थापक, अहम्युन बायोसायन्सेस उपस्थित होत्या. यामध्ये कलाकार तेजल गायकवाड, जुबी, उद्योजिका लेखिका जुही गुप्ते, लेखिका आशा गौर, रेश्मा घणेकर,रुचा लिमये, हर वर्ड इंडिया अध्यक्ष राखी बक्षी यांनी आपल्या कथा सांगितल्या. डॉ. बापट यांनी वैज्ञानिक क्षेत्रातील संघर्ष, पवनीत कौर यांनी विकासात महिलांची भूमिका तर डॉ. गंजू यांनी महिलांसाठी समान संधींच्या परिसंस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी अर्हम फौंडेशन संचालिका राजश्री पगारिया, उपाध्यक्षा प्रीती पगारिया, प्राचार्य डॉ अमन मिश्रा, प्राचार्या प्रभा बटवाल, डॉ प्रज्ञा देशपांडे, बरखा जयसिंघनी उपस्थित होते. सूत्रसंचालन पौर्णिमा पांडे यांनी केले तर आभार अर्हम फाउंडेशनच्या उपाध्यक्ष प्रीती पगारीया यांनी मानले. कॉलेजच्या तरुण विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

वन्यजीव संवर्धन आणि मानव-बिबट सहजीवनाबाबत जनजागृती



जुन्नर (आरंभ पर्व) : कुरण ता.जुन्नर येथील जयहिंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये जुन्नर वनविभागाच्या वतीने वन्यजीव संवर्धन आणि मानव-बिबट सहजीवन याबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयात शुक्रवार, दि. २३ रोजी झालेल्या ह्या विशेष कार्यक्रमात 'बिबट व्याख्यान' झाले. या माध्यमातून बिबट विषयी माहिती देऊन वन्यजीव संवर्धन आणि मानव-बिबट सहजीवन याबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दत्तात्रय गल्ले, जुन्नर पर्यटन विकासाचे अध्यक्ष यश मस्करे, वनक्षेत्रपाल प्रदीप चव्हाण, सहाय्यक उपवनसंरक्षक अंकुश शिंदे , स्मिता राजहंस तसेच प्रा.वाल्मीक घोलप,वनविभाग जुन्नरचे अधिकारी व कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रिसायडिंग ऑफिसरची स्वाक्षरी नसल्याचा आरोप

पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक प्रक्रियेत काही मतपेट्यांवरील लिफाफ्यांवर प्रिसायडिंग ऑफिसर यांची स्वाक्षरी नसल्याचा आरोप पुणे पदवीधरचे उमेदवार प्रा. आनंद जेठे आणि पुणे शिक्षक च्या उमेदवार प्रा. दिपाली सूर्यवंशी जेठे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी २४ ऑक्टोबर २०२६ रोजी माननीय निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली आहे. तक्रारीत नमूद केल्यानुसार, पुण्यातील बॅडमिंटन हॉल, बालेवाडी स्टेडियम येथील स्ट्रॉंग रूममधील मतपेट्यांचे निरीक्षण करताना काही मतपेट्यांवरील लिफाफ्यांवर प्रिसायडिंग ऑफिसर यांची स्वाक्षरी नसल्याचे निदर्शनास आल्याचा दावा करण्यात आला आहे. निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता, विश्वासार्हता आणि नियमबद्धता कायम



राखण्यासाठी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दोन्ही उमेदवारांनी केली आहे. तक्रारीनुसार, संबंधित मतपेट्यांवरील लिफाफ्यांची नियमानुसार तपासणी करून स्वाक्षरीसंदर्भातील बाब स्पष्ट करण्यात यावी. स्वाक्षरी नसल्याची बाब निश्चित झाल्यास, लागू निवडणूक नियमांनुसार योग्य ती कार्यवाही करावी आणि आवश्यकतेनुसार संबंधित ठिकाणी फेरनिवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

येरवडा खुल्या कारागृहात मोफत नेत्र तपासणी शिबिर

- ४६ जणांची तपासणी
- 'दृष्टी सुरक्षित, भविष्य उज्ज्वल!'
- उपक्रमातून शिक्षाबंदी आणि कर्मचाऱ्यांना नेत्र आरोग्याबाबत मार्गदर्शन

पुणे (दै. आरंभ पर्व)

येरवडा खुले कारागृह आणि डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर, माणिकबाग, सिंहगड रस्ता यांच्या संयुक्त विद्यमाने 'दृष्टी सुरक्षित, भविष्य उज्ज्वल!' या संकल्पनेतून मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या ३६ शिक्षाबंदींसह १० कर्मचाऱ्यांची, अशा एकूण ४६ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली.

शिबिरादरम्यान तपासणी करण्यात आलेल्या व्यक्तींना त्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याविषयी आवश्यक समुपदेशन, उपचार आणि पुढील वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. नेत्रविकारांचे वेळेत निदान व्हावे आणि योग्य उपचारांद्वारे दृष्टीचे संरक्षण व्हावे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरच्या सल्लागार व व्यवस्थापक अश्विनी पवार, ऑप्टोमेट्रिस्ट ऋतुजा गाडेकर आणि जयंत जाधव यांनी शिबिरात सहभागी होऊन नेत्र तपासणी केली. तसेच उपस्थितांना डोळ्यांची नियमित तपासणी, नेत्रविकारांची लक्षणे आणि वेळेवर उपचार घेण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे शिक्षाबंदी आणि कारागृह कर्मचाऱ्यांमध्ये नेत्र आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली. तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला आणि उपचारांची दिशा मिळाल्याने शिबिराचा लाभ सहभागी व्यक्तींना झाला.



शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अधीक्षक शामकांत शेडगे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी निशा श्रेयकर, कार्यालयीन अधीक्षक नीता उके, वरिष्ठ लिपिक गोविंद गावडे, लिपिक प्रविण खुस्पे, मिश्रक अभिषेक रौंधळ, सुभेदार दत्तात्रय चव्हाण, बालाजी सावंत, सुनील गायकवाड, हवालदार प्रकाश भोसले, राजेंद्र धनगर, वैशाली थोरात, लता पिसे, शिपाई शैला कदम, सुरेखा म्हेत्रे, वैभव पाटील आणि अशोक होले यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी सुरक्षा व्यवस्था, समन्वय आणि नियोजनाची जबाबदारी पार पाडली. नेत्र आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला. अशा आरोग्यविषयक उपक्रमांमुळे कारागृहातील शिक्षाबंदी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मदत होते.

कचऱ्याच्या विळख्यातून केसनंदगाव मुक्त होणार?

रस्त्यावर कचरा टाकू नये. यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने कोणत्याही प्रकारचा नामफलक न लावण्यात आल्यामुळे व सदर कचरा टाकणाऱ्या व्यक्तीवर कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई करण्यास ग्रामपंचायत प्रशासन असमर्थ ठरल्यामुळे रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांना देखील मोकळे रान सापडून ते न घाबरता असा रस्त्यावर बिनधास्तपणे कचरा टाकून स्वतःसह इतर नागरिकांच्या आरोग्याशी खेळत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी केसनंदकारकडून होत आहे.

रस्ते बनले कचऱ्याचे आगार

घनकचरा घोटाळ्याचा अगोदरच ठपका

पुणे (दै. आरंभ पर्व)

घनकचरा घोटाळ्याने चर्चेत आलेल्या केसनंद गावातील रस्तेच हे पुन्हा कचऱ्याचे आगार बनल्यामुळे संबंधित गाव कचऱ्याच्या विळख्यात अडकून येथील स्थानिक नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यामुळे पुणे राहून मार्गावर असलेले हे मुख्य गाव कचऱ्याच्या व्यवस्थेतून मुक्त होणार का हा प्रश्न स्थानिकांना अनेक गेल्या महिन्यापासून स्वतः होत आहे.

पुणे शहरापासून अठरा किमी असे हाकेच्या अंतरावर वसलेल्या केसनंद गावात सध्या खाजगी कंपन्यांचे जाळे पसरल्यामुळे परिसरात कामाच्या शोधार्थ



राज्यासह परराज्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात स्थायिक झाल्यामुळे या गावचे रूप पालटून शहराचे अथवा उपनगर परिसराचे रूप प्राप्त झाले आहे. त्यातच परिसरातूनच दौंड तालुक्यासह सोलापूर_अहिल्यानगर जिल्ह्याकडे जाण्यासाठी मार्ग जोडल्यामुळे परिसरात नेहमीच वाहनांची वर्दळ दिसून येत असली तरी पण स्थानिक नागरिकांना चांगल्या प्रकारे सुविधा मिळण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत मार्फत पिण्याच्या पाण्यासह कचरा गाडी, विद्युत दिवे, तर पक्के रस्त्यांची सुविधा जरी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे. मात्र परिसरात वाढलेल्या टोलेजंग इमारतीमधील नागरिक हा घरगुती असणारा कचरा हा कचरा गाडीत न टाकता वाडेबोल्हाई, वाघोली, श्री क्षेत्र थेऊर या मार्गावरील मुख्य रस्त्यावर टाकत असल्यामुळे परिसरातील अनेक चौकांनी कचऱ्याचे ढिग साचल्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. त्यामुळे अनेक असलेल्या मुख्य मार्गांनी साचलेल्या कचऱ्यामुळे मोकाट जनावरांचा वावर नेहमीच दिसून येत आहे. त्यातच परिसरात साचणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधीचे प्रमाण वाढल्यामुळे गावात ऐन पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया यासारख्या महाभयंकर आजाराची साथ पसरते की, काय? याची धास्ती नागरिकांमध्ये निर्माण होऊन अनेक रुग्ण हे डेंग्यू, मलेरिया यासारख्या आजाराने ग्रस्त झाले आहेत.नेहमीच होणाऱ्या या त्रासामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष करून यासंदर्भात ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना यासंदर्भात वारवार तक्रार करून देखील स्थानिक नेते व प्रशासन अधिकाऱ्यांनी गंभीर घटनेकडे दुर्लक्ष करत पाठ फिरून नागरिकांच्या तक्रारींना केराची टोपली दाखविल्यामुळे स्थानिक नागरिक देखील कचऱ्याच्या होणाऱ्या त्रासाने हैराण झाले आहेत.एकीकडे पुणे प्रशासनाच्या वतीने राज्यभर स्वच्छ व सुंदर उपक्रमाचा गाजावाजा करत तो मी नव्हेचची भूमिका बजावत असतानाच दुसरीकडे मात्र शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेली गावेच जर कचऱ्याच्या विळख्यात अडकत असतील तर प्रशासनाच्या वतीने राबविण्यात येणारा उपक्रम हा फुसका बार ठरला असून स्वच्छ पुणे व सुंदर पुणे हा उपक्रम सध्या हवेतच वीरला असल्याचे परिसरातील रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यावरून सिद्ध होत आहे. याबरोबरच दिड ते दोन महिन्यापूर्वी गावातील घनकचरा घोटाळ्यामुळे हे गाव चर्चेत आले असताना त्यावेळेस सत्ताधारी व विरोधक हे एकम एकमेकावर आरोप करून फैरी झाडत होते.

मात्र सध्या दोन्ही बाजूकडील नेत्यांनी गप्प राहून शांत राहण्यावरच भर देऊन सध्या कचऱ्याचा विषय ऐरणीवर आला असताना देखील याविरोधात दोन्ही बाजूकडील नेते काहीच भाष्य करत नसल्याने स्थानिक नागरिक हे आश्चर्य व्यक्त करत आहेत. यासह रस्त्यावर साचत असलेल्या कचऱ्यावर ग्रामपंचायत प्रशासन उपाययोजना करण्यात असमर्थ ठरून प्रशासनाने नागरिकांच्या मुख्य समस्येलाच केराची टोपली दाखविल्यामुळे स्थानिक नागरिकांना नेत्यांसह प्रशासन अधिकाऱ्यांसमोर नतमस्तक होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे शहराच्या अगदी नजीक असलेल्या केसनंद येथील कचऱ्याचा ऐरणीवर आलेला प्रश्न सुटणार का? हाच सवाल स्थानिक नागरिक पडले असून गेल्या अनेक महिन्यापासून हा मुख्य प्रश्न आज ना उद्या सुटेल याच प्रतीक्षेत ग्रामस्थांना वाट पाहण्याची वेळ येत आहे. यामुळे कचऱ्याच्या विळख्यात अडकलेल्या केसनंद गावची या मुख्य समस्येतून सुटका होणार का हा प्रश्न ग्रामस्थांचं बाहेरून येणाऱ्या नागरिकांना पडला आहे. त्यामुळे नागरिकांच्या मुख्य समस्याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने लक्ष केंद्र करून असलेला कासाराचा मुख्य प्रश्न मार्गी लावावा अशी अपेक्षा केसनंदकरांकडून व्यक्त केली जात आहे.

पालिकेच्या इमारतीचेच वाजले तीनतेरा

पुणेकरांचे भाग्य की दुर्भाग्य : विद्युत केबलचे पाईप गंजलेल्या अवस्थेत : पिण्याच्या पाण्याच्या टाकीचा झाला खराडा : इमारत बनली गुटख्याचे आगार

पुणे (दै. आरंभ पर्व)

विकासकामांच्या नावाने शहराची सूत्रे हातात घेतलेल्या व रोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या पुणे महानगरपालिकाच विविध समस्यांच्या विळख्यात अडकून संबंधित इमारत गुटख्याचे आगार बनल्याने स्वच्छतेचे धडे देणाऱ्या पालिका इमारतीचे तीनतेरा वाजले असल्याचे म्हणण्याची वेळ आता सर्वसामान्य जनतेवर आली आहे. पुणे येथे काय उणे या म्हणीप्रमाणे शहराचा विकास होण्याच्या दृष्टीने आज शहरातीप जवळपास १४३ प्रभागांची विकासकामे करण्याच्या उद्देशाने असलेली चावी ही पुणे महानगरपालिकेच्या हातात असल्यामुळे उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम भागातील रखडलेली, रस्ते, विद्युत दिवे, पिण्याचे पाणी, फूटपाथ, ड्रेनेज लाईन आदी नागरिकांची असणारी महत्वाची कामे पालिकेमार्फत राबवली जात आहे. त्यातच शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पालिका प्रशासनाच्या वतीने टोलेजंग इमारत उभारली गेल्यामुळे रोज हजारोंच्या संख्येने राजकीय नेत्यांसह नागरिक संबंधित इमारतीमध्ये कामानिमित्त पालिकेच्या जुन्या इमारतीमध्ये येत असतात. जर कोणी अधिकारी कामानिमित्त बाहेर गेले असतील तर येणाऱ्या नागरिकांना त्यांची प्रतिक्षा करण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे असे नागरिक कार्यालयाच्या बाहेर ताटकळत उभे राहण्यापेक्षा त्यांच्यासाठी लाकडी, लोखंडी, व खुर्च्यांची देखील बैठक व्यवस्था करण्यात आली असली तरी पण अनेक असलेल्या लाकडी व प्लास्टिक खुर्च्या तुटलेल्या अवस्थेत असल्यामुळे अशा खुर्चीवर येणाऱ्या व्यक्तीस नाईलाजास्तव बसण्याची वेळ येत आहे. त्यामुळे एखाद्या दिवशी तुटलेल्या अवस्थेत असलेल्या खुर्चीवर काही दुर्घटना घडली तर यास जबाबदार कोण? असा संतप्त सवाल सर्वसामान्य जनतेकडून करण्यात येत आहे. यासह इमारतीमधील प्रत्येक कार्यालयात गॅलरी बांधण्यात आली आहे. मात्र असणाऱ्या गॅलरीमध्ये सर्रासपणे गुटखा खाऊन नागरिक किंवा प्रशासन अधिकारी थुंकत असल्यामुळे येथे येणाऱ्या प्रत्येक नागरिकास असलेली इमारत ही पालिकेची आहे की, खाजगी मालकीची आहे. हा मुख्य प्रश्न अनेकांना सतावत आहे. त्यामुळे पालिकेची इमारतच जर गुटख्याचे आगार बनत असेल तर सर्वसामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कोणाकडे? हा प्रश्न उपस्थित होऊन तरुण वर्गांना व्यसनापासून मुक्त करण्याच्या उद्देशाने पालिका आरोग्य विभागाच्या वतीने तरुण वर्गात जनजागृतीचे उपक्रम राबविले जात असतानाच येथील चित्र पाहून आता पालिकेच्या अधिकाऱ्यांनाच व्यसनाचे धडे गिरवण्याची वेळ आली आहे. तर इमारती मधील अनेक भागात लोखंडी पाईपव्दारे विद्युत केबल टाकण्यात आली आहे. मात्र टाकलेल्या पाईप हे अतिशय जुन्या व गंजलेल्या अवस्थेत असून त्यामधून सुरू असलेल्या केबल बाहेर येऊन उघड्यावरील केबलला चिकटपट्टया लावण्यात आल्याने इमारतीमध्ये शॉर्टसर्किट होण्याची शक्यता नाकारता येत नसून मोठी दुर्घटना होण्याची भीती नागरिकांमधून व्यक्त होत होऊन येथील कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सध्या ऑक्टोबर हिट असल्याने अनेक अधिकारी व जनता हे कार्यालयात थकून येत असतात. त्यामुळे थकलेल्या जीवांना थंड पाणी मिळावे हा हेतू समोर ठेवून पालिका प्रशासनाच्या वतीने प्रत्येक कार्यालयालगत थंड पाण्याची मशीन बसविण्यात आली आहे. पण येथे असे निदर्शनास आले की, अनेक इमारतीमधील असलेल्या मशीन ह्या बंद अवस्थेत असलेल्या स्थितीत दिसून येत आहे. तर काही मशीनमध्ये पाणीच भरले न गेल्यामुळे त्या ठणठणीत कोरड्या अवस्थेत असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे सदर पालिका प्रशासन अधिकारी व कर्मचाऱ्यांची तहान भागवू शकत नाही. ती पालिका शहरातील जनतेची काय? तहान भागविणार असा सवाल आता उपस्थित होऊ लागला असतानाच अनेक ठिकाणी कार्यरत असलेले सफाई कामगार वेळेत कचरा उचलत नसल्याने पिण्याच्या पाण्याच्या टाकीलगत कचऱ्याचे साम्राज्य वाढल्याचे दिसून येत आहे. यासह इमारतीत अनेक ठिकाणी ठेकेदाराच्या भोंगळ व पालिका अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित कारभारामुळे उघड्यावर विद्युत केबलचे जाळे पसरले आहे याकडे कोणी लक्ष केंद्रित करत नसल्याने झोपी गेलेल्या पालिका प्रशासनास गंभीर स्वरूपाची दुर्घटना घडल्यावरच जाग येणार का? हा मुख्य सवाल कार्यालयात येणारे नागरिक करत आहेत. तर अनेक कार्यालयाच्या गेटवर लोखंडी दरवाजे बसून अशा दरवाजांना काचा बसविण्यात आल्या आहेत.मात्र अनेक लोखंडी दरवाजांच्या काचाच फुटल्यामुळे प्रशासन अधिकाऱ्यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर येऊन जी जनता न्यायाच्या उद्देशाने पालिकेकडे धाव घेत असताना त्याच जनतेला पालिकेच्या इमारतीमधील विविध प्रकारची दुरावस्था पाहायला मिळत असेल तर त्यांनी न्यायाच्या अपेक्षेने खरोखर पालिका कार्यालयात यायचे की, नाही ते येथील असलेल्या दृश्यावरून पाहायला मिळत आहे. तरी अधिकाऱ्यांच्याच नाही तर जनतेच्या जीवाचा खेळ पाहणाऱ्या पालिका प्रशासनाने याकडे लक्ष केंद्रित करून दुरावस्था झालेल्या साहित्यांची सुधारणा करण्याची मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत आहे.



मुंबईनंतर सर्वात जास्त महसूल मिळून देणारी महापालिका म्हणून पुणे महानगरपालिकेकडे पाहिले जात आहे. त्यातच विकासकामांच्या नावाखाली पालिकेमधून रोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असताना जर पालिकेच्या इमारतीची अशा प्रकारची दुर्दैवी अवस्था होत असेल तर पालिका प्रशासन खरोखर प्रथम जनतेचे नाही तर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या समस्या सोडवण्यास सक्षम आहेत का? हा सवाल आता जनताच करून पालिकेच्या अशा कारभारामुळे जनतेला संभ्रमात पडण्याशिवाय पर्याय नसून पालिकेच्या अशा अवस्थेमुळे यासारखी दुसरी शोकांतिका दुसरी असू शकत नाही. हे स्पष्ट जाणवत आहे.

इमारतीमध्ये नागरिकांसाठी स्वच्छतागृह उभारण्यात आले असले तरी पण त्या ठिकाणी हात दोन्ही ठेवा हात धुण्यासाठी बसवण्यात आलेले नळद तुटलेले अवस्थेत अथवा गायब असल्याचे पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीमुळे पालिकेचे इमारतीची अशा प्रकारची अवस्था असेल तर यासारखे पुणेकरांचे दुर्दैव कोणते असू शकते असे म्हणावे लागेल.

थोडक्यात पण महत्वाचे



प्रतिकूल परिस्थितीतही रुग्णसेवेचा वसा; डॉ. विराज भोसले यांचा सन्मान

कोंढवे-उत्तमनगर (आरंभ पर्व) : रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून कोंढवे-उत्तमनगर परिसरात नागरिकांना उत्तम वैद्यकीय सेवा देणारे डॉ. विराज भोसले यांचा आज विशेष सन्मान करण्यात आला. चेअरमन भगवानराव मोरे,पांडुरंग काटे व सौरभ मोकाशी इतर ग्रामस्थांच्या उपस्थितीत हा सत्कार करण्यात आला. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेक आव्हानांचा सामना करत डॉ. विराज भोसले यांनी रुग्णांना वैद्यकीय सेवा दिली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी रुग्णसेवेचे कर्तव्य जपले. त्यांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे परिसरातील नागरिकांना मोठा आधार मिळाला. वैद्यकीय क्षेत्रात काम करताना रुग्णांप्रती असलेली बांधिलकी, सेवाभाव आणि सामाजिक जाणीव यांचे महत्त्व डॉ. भोसले यांच्या कार्यातून अधोरेखित होते. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजाप्रती आपली बांधिलकी जपणाऱ्या डॉ. विराज भोसले यांच्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले.



काळी आई वाचवायला हवी ; तरच पुढची पिढी टिकेल : राहीबाई पोपेरे

पुणे (आरंभ पर्व) : मी निसर्गाची आणि मातीची शाळा शिकले. गरीबी आली तरी लाजू नये आणि श्रीमंती आली तर माजू नये, हे मला वडिलांनी शिकविले. ती शिकवण मी लक्षात ठेवली. जे दिसायला चांगले आहे, ते आरोग्याला घातक आहे. आज आपण सगळे आरोग्याला घातक असलेले खात आहोत. त्यामुळे चारच भाज्या खा, पण आपले आरोग्य चांगले ठेवा. प्रत्येकाच्या ताटात विषमुक्त भाजी जायला हवी. काळी आई अन्न देते, ती आपण वाचवायला हवी. तरच पुढची पिढी टिकेल, असे मत पद्मश्री राहीबाई पोपेरे यांनी व्यक्त केले. नऱ्हे मानाजीनगर येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् च्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन संस्थेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ संपादक विजय बाविस्कर, संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यंदाचा जीवनगौरव पुरस्कार माजी खासदार, समाजसेवक प्रा. जोगेंद्र कवाडे यांना प्रदान करण्यात आला. तसेच पद्मश्री राहीबाई पोपेरे यांना कृषी क्षेत्रातील पुरस्कार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे अध्यक्ष औदुंबर उकिरडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कार, सिने अभिनेता मिलिंद शिंदे यांना कला क्षेत्रातील पुरस्कार, पुणे अर्बन को-ऑप बँकेचे अध्यक्ष निलेश ढमढेरे यांना सहकार क्षेत्रातील पुरस्कार आणि समाज प्रबोधन चॅरिटेबल ट्रस्टचे जयंत हिरे यांना सामाजिक क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल असे पुरस्काराचे स्वरुप होते.

सई ससाणे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

जुन्नर (दै. आरंभ पर्व)

नाशिक येथील आंतर महाविद्यालयीन 'वसंत करंडक' राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जुन्नरच्या श्री शिवछत्रपती कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी सई नितीन ससाणे हिने प्रथम क्रमांक मिळवून आपल्या वक्तृत्व कलेचा ठसा राज्यपातळीवर उमटवला आहे. ह्या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. या स्पर्धेत सईने 'युवा भारत : विकासाची संधी की बेरोजगारीची चिंता' या विषयावर प्रभावी विचार मांडले. तिच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणाने परीक्षकांची मने जिंकली. याच स्पर्धेत अकरावी विज्ञान शाखेतील प्राची संदीप पवार हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवून महाविद्यालयाच्या यशात भर घातली. दरम्यान, नाशिक येथे मंगळवारी सई ससाणे हिस प्रशस्तिपत्रक, सन्मानचिन्ह आणि ११ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सईने यापूर्वी 'युवा भारत आणि विकासाची संधी की बेरोजगारीची चिंता', तर प्राचीने 'कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी की आव्हान' या विषयांवर आपले विचार मांडले होते. विजेत्या विद्यार्थिनींना वादविवाद मंडळाच्या प्रमुख प्रा. वर्षा देसाई आणि प्रा. सारिका सोनार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. संजय काळे, उपाध्यक्ष निवृत्ती काळे, सचिव दत्तात्रेय थोरात, सहसचिव सुभाष कवडे, खजिनदार कांता मसकरे, अध्यक्ष प्रतिनिधी प्रा. व्ही. बी. कुलकर्णी तसेचप्राचार्य डॉ. महादेव वाघमारे यांनी या गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.



विकासाच्या नावाखाली वृक्षतोड नको

निसर्गाचे रक्षण हीच शिवरायांना खरी आदरांजली!



• शब्दांकन : राजेश बोबडे •
पर्यावरणवादी नागरिक

(दै. आरंभ पर्व)

आज सर्वच राजकारणी छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतात. मात्र, महाराजांचे विचार आपण खरोखरच समजून घेतले आहेत का? केवळ महाराजांचा जयजयकार करून चालणार नाही, तर त्यांच्या विचारांचे आचरणही झाले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेच्या हिताची काळजी घेणारे दूरदृष्टीचे राजे होते. त्यांना निसर्गाचे महत्त्वही चांगलेच ठाऊक होते. आरमारासाठी लाकडाची आवश्यकता असतानाही रयतेच्या आंबा, फणस यांसारख्या उपयोगी झाडांची तोड करताना काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या होत्या. मग आज त्यांच्या नावाने राजकारण करणाऱ्या राज्यकर्त्यांना पर्यावरण संवर्धनाचा विसर का पडतो? भीमाशंकरसह विविध ठिकाणी विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड चिंताजनक आहे. आज हवामान बदल, वाढते तापमान, पाणीटंचाई आणि अनियमित पाऊस यांसारख्या समस्यांचा सामना आपण करत आहोत. अशा परिस्थितीत झाडांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. मात्र, विकासाच्या नावाखाली वर्षानुवर्षे वाढलेली झाडे तोडली जात असतील, तर भविष्यातील पर्यावरणीय संकटांची जबाबदारी कोण घेणार? टोरेंट कंपनी वन विभागाला तिप्पट जागा देणार असून, त्या ठिकाणी सरकार ६० हजार आणि कंपनी ९० हजार झाडे लावणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितल्याचा उल्लेख केला जात आहे. मात्र, एखाद्याचे दोन पाय कापून त्याला लाकडी चार पाय बसवण्यासारखा हा प्रकार आहे. कारण झाडे लावणे आणि ती जगवणे यात मोठा फरक आहे. वर्षानुवर्षे वाढलेल्या वृक्षांची जागा नवीन रोपे तात्काळ घेऊ शकत नाहीत. 30 ते 40 हजार वृक्ष तोडण्यात येणार आहे, याच वृक्षांच्या जीवावर जंगलातील पक्षी प्राणी कीटक असे लाखो जीव जगत असतात. त्यांना मारण्याचा आपल्याला अधिकार आहे का याचा विचार सर्व नागरिकांनी आणि सरकारने करावा. माझा विकासाला विरोध नाही; मात्र विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी दिला जाऊ नये. पर्यावरणाचे रक्षण ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. त्यामुळे भीमाशंकरसह विविध ठिकाणी होणारी वृक्षतोड रोखण्यासाठी नागरिकांनी एकत्र यावे आणि लोकशाही मार्गाने आंदोलन उभारावे. झाडे वाचवा, निसर्ग वाचवा आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करा!

दैनिक आरंभपर्वचे व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे यांना 'सरदार पटेल हिंदू रत्न पुरस्कार' जाहीर

राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त ३१ ऑक्टोबर रोजी पुण्यात पुरस्कार वितरण सोहळा

उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)

दैनिक आरंभपर्वचे व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे यांना यंदाचा 'भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ समाजसेवक तथा पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्टचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. रवींद्र भोळे यांनी दिली.

अखंड भारताचे शिल्पकार, लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकात्मता दिनाचे औचित्य साधून पुण्यात या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत नवी पेठेतील संकल्प बँक्वेट हॉल, एलबीएस मार्ग, पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे. पद्मश्री डॉ. मणीभाई देसाई मानव सेवा ट्रस्टच्या वतीने आयोजित या सोहळ्यात विविध क्षेत्रांत समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा सन्मान करण्यात येणार आहे. खादी व ग्रामोद्योग विभागाचे राज्यमंत्री दर्जा असलेले अध्यक्ष रवींद्र साठे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी प्रतिक गंगणे यांच्यासह डॉ. पांडुरंग दगडू सराफ, ममता यशवंत पाटील, विजयमाला महादेव पवार, डॉ. सुरेश जगन्नाथ रौंदळे, रश्मी नरेंद्र जोशी, डॉ. स्मिता विनायक सहस्रबुद्धे, डॉ. हरी निवृत्ती पाटील यांच्यासह पत्रकारिता, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि समाजसेवेच्या क्षेत्रात कार्यरत अनेक मान्यवरांची निवड करण्यात आली आहे.

विविध क्षेत्रांतील सेवाव्रतींचा होणार सन्मान



सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांचे स्मरण करून समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करणे, हा या सोहळ्याचा प्रमुख उद्देश आहे. अशी माहिती डॉ. रवींद्र भोळे यांनी दिली. यावेळी सुभाष कट्यारमल उपस्थित होते. पुण्यात होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्याकडे विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे लक्ष लागले आहे.

दैनिक आरंभपर्वच्या माध्यमातून व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे हे पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांना जाहीर झालेल्या या पुरस्कारामुळे आरंभपर्व परिवारात आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या सहकाऱ्यांकडून आणि हितचिंतकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.



'प्रतिध्वनी' पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन

पुणे (दै. आरंभ पर्व)

साहित्य, कविता आणि संगीत यांचा सुरेल संगम साधणारा 'प्रतिध्वनी' पुस्तक प्रकाशन सोहळा आणि त्यानिमित्त आयोजित 'स्मृतींचा मागोवा' या विशेष काव्य-संगीत मैफिलीचा कार्यक्रम रविवारी पुण्यात उत्साहात पार पडला. जानी विश्वनाथ लिखित आणि 'Echoes of Light' या मूळ इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद असलेल्या 'प्रतिध्वनी' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा माई पब्लिकेशन्सच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगरच्या अपर जिल्हाधिकारी मा. मोनिका सिंग होत्या, तर प्रसिद्ध कवी आणि गीतकार वैभव जोशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे वैभव जोशी यांनी आपल्या भाषणात 'प्रतिध्वनी' या पुस्तकाविषयीं बोलताना अंधाऱ्या वाटेवरून जाताना मशालीसारखा उजेड दाखवणारं हे पुस्तक आहे असं सांगून पुस्तकाची ओळख करून दिली. माणसं आपल्यापर्यंत पोचवणारं ळ, रंग-चव-दृश्य-गद्य-पद्य यांचा एकत्रित अनुभव देणाऱ्या या संग्रहात माणूस जिवंत करण्याचं कसब आहे असं सांगितलं. कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. मोनिका सिंग यांनी पुस्तकातील कथा आणि कविता उलगडत मनातल्या विस्मृतीत गेलेल्या भावना आणि स्वतःलाही कधी न विचारलेले प्रश्न मांडणारं देखणं आणि संवेदनशील पुस्तकं मराठीत आलं याबद्दल प्रकाशन संस्था आणि लेखिका जानी विश्वनाथ यांचे कौतुक केले. पुस्तक प्रकाशन सोहळ्यानंतर आयोजित 'स्मृतींचा मागोवा' या विशेष मैफिलीने कार्यक्रमात काव्य आणि संगीताची सुरेल रंगत भरली. सुप्रसिद्ध कवी व गीतकार वैभव जोशी आणि प्रसिद्ध गझलकार ममता सपकाळ यांनी कविता वाचनातून रसिकांना साहित्यिक आनंद दिला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.



धूळ-चिखलाच्या विळख्यात नागरिक; महापालिकेकडून कार्यवाहीचे आश्वासन : धायरी ब्रिजवर धुळीचा प्रश्न ऐरणीवर; नागरिकांना होतोय प्रचंड त्रास

दिल्ली नव्हे, ही तर धायरी!

- तात्काळ कार्यवाही करा
- शिवाजीराव मते पाटील, रुपेश घुले पाटील यांची मागणी!!

धायरी (दै. आरंभ पर्व)

उपनगराचा झपाट्याने विस्तार होत असताना पायाभूत सुविधांचा प्रश्नही ऐरणीवर येत आहे. धायरी ब्रिज परिसरातील धूळ आणि चिखलामुळे नागरिकांसह वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी आहेत. पाणीपुरवठ्याच्या टँकर पॉईंटलगतचा कच्चा रस्ता, टँकरची वर्दळ आणि रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांटच्या वाहनांमुळे रस्त्यावर चिखल व माती पसरत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ उडत असून, दृश्यमानता कमी झाल्यास अपघात होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी कॅनॉल रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करावे आणि आरएमसी प्लांटची नियमांनुसार तपासणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

धायरी ब्रिजजवळ पाणीपुरवठ्यासाठी टँकर भरण्याचा पॉईंट आहे. या परिसरातील कच्च्या रस्त्यावर टँकरच्या वर्दळीमुळे चिखल होत असल्याची तक्रार आहे. याच मार्गावरून आरएमसी प्लांटची वाहनेही ये-जा करतात. चिखल आणि माती वाहनांच्या चाकांमधून पुढे ब्रिजपर्यंत पोहोचत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येते. त्यामुळे रस्त्यावर चिखल साचणे आणि वाहनांच्या वर्दळीमुळे धूळ उडणे, अशा समस्या निर्माण होत आहेत. धुळीचे प्रमाण वाढल्याने वाहनचालकांना रस्ता स्पष्ट दिसण्यात अडचणी येऊ शकतात. याशिवाय, धुळीच्या सततच्या संपर्कामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

धायरी परिसराचा विस्तार होत असल्याने आगामी काळात बांधकामे आणि विकासकामांची गरज वाढणार आहे. त्यासाठी आरएमसी प्लांटची आवश्यकता असली, तरी त्यातून नागरिकांना धूळ आणि प्रदूषणाचा त्रास होऊ नये, यासाठी प्लांट बंदिस्त अर्थात 'इनडोअर' स्वरूपात उभारण्याची संकल्पना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते पाटील यांनी मांडली आहे. टँकर पॉईंटलगतच्या कॅनॉल रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण केल्यास चिखलाची समस्या कमी होण्यास मदत होईल. तसेच आरएमसी प्लांटची परवानगी, नियमांचे पालन आणि धूळ नियंत्रणाच्या उपाययोजनांची तपासणी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. या समस्येबाबत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुणे परिसरातील आरएमसी प्रकल्पांना बंद करण्यासंदर्भात नोटिसा दिल्याचेही वृत्त समोर आले आहे.

धायरी-वडगाव परिसरातील आरएमसी प्लांटवरील कारवाईचा मुद्दाही चर्चेत आला होता.

मात्र, धायरी ब्रिज परिसरातील नेमक्या कोणत्या प्लांटला नोटीस देण्यात आली आहे आणि त्यावर लवकरच कार्यवाही होणार असल्याचे सांगण्यात आले... रस्त्याचे काँक्रीटीकरण, आरएमसी प्लांटची तपासणी आणि धूळ नियंत्रणाच्या उपाययोजना या तीन बाबींवर प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. महापालिकेने कार्यवाहीचे आश्वासन दिले असले, तरी प्रत्यक्षात कोणती पावले उचलली जातात, याकडे धायरीकरांचे लक्ष लागले आहे.



दैनिक आरंभपर्व EXCLUSIVE

"समस्येची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. नागरिकांचा हा प्रश्न सोडवण्यासाठी निश्चित प्रयत्न केले जातील."

- प्रज्ञा पोतदार
सहाय्यक आयुक्त,
सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय

'अनेक वर्षांपासूनचा त्रास; नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न'

या परिसरात अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहर उपाध्यक्ष रुपेश घुले पाटील यांनीही नागरिकांच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. धुळीमुळे दृश्यमानता कमी झाल्यास अपघातांचा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

"विकासकामांसाठी आरएमसी प्लांटची गरज आहे; मात्र त्याचा नागरिकांना त्रास होता कामा नये. त्यामुळे आरएमसी प्लांट बंदिस्त (इनडोअर) स्वरूपात उभारावेत. कॅनॉल रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करून धूळ आणि चिखलाची समस्या दूर करावी. प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात; अन्यथा आंदोलन करण्यात येईल."

- शिवाजीराव मते पाटील, विधानसभा प्रमुख, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष

"मी अनेक वर्षांपासून या भागात राहत आहे. येथील नागरिकांना धूळ आणि चिखलाचा त्रास सहन करावा लागत आहे. दृश्यमानता कमी झाल्याने अपघात होण्याची भीती आहे. प्रशासनाने नियमानुसार आवश्यक कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा."

- रुपेश घुले पाटील, शहर उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)

नवदुर्गा पुरस्काराने संध्या बेनकर यांचा गौरव

धायरी (दै. आरंभ पर्व)

धायरी येथील राष्ट्रभक्ती सामाजिक संस्थेच्या संस्थापिका सौ. संध्या किरण बेनकर यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यस्तरीय 'आरंभपर्व नवदुर्गा पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यशस्विनी विकास प्रतिष्ठान, पुणे प्रहार यांच्या संयुक्त विद्यमाने धायरी फाटा येथील सिल्व्हर पेटल्स सभागृहात या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक कार्य, जिद्द, संघर्ष आणि समाजपरिवर्तनासाठी योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान



महिलांचा या सोहळ्यात सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर मंजुषाताई नागपुरे, सामाजिक कार्यकर्त्या तृप्तीताई देसाई, यशस्विनी विकास प्रतिष्ठानच्या संस्थापिका सुनिताताई डांगे, आरंभपर्वच्या सुरेखा मते प्रतीक गंगणे,लक्ष्मण साबळे यांच्यासह अभिनेत्री मोनालिसा बागल, मयुरी नव्हते, स्नेहा बालतांडे आणि सुप्रिया धोत्रे उपस्थित होत्या. पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे होते. सौ. संध्या बेनकर यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल राष्ट्रवादीचे नगरसेवक काकासाहेब चव्हाण, धायरीच्या माजी सरपंच जयश्रीताई पोकळे, समाजसेविका तृप्तीताई पोकळे, अनिताताई जोशी, आशाताई बेनकर, किरण बेनकर तसेच राष्ट्रभक्ती सामाजिक संस्थेचे सदस्य आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

संजय पासलकर यांच्याकडून ग्रंथालयास १५ हजारांची पुस्तके भेट

कै. कमल पासलकर व कै. रतन पासलकर यांच्या स्मरणार्थ उपक्रम; विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा

खानापूर-डोणजे (दै. आरंभ पर्व)

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची कक्षा रुंदावावी आणि शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी, या उद्देशाने उद्योजक तथा कै. बाबुराव पासलकर प्रतिष्ठान, पुणेचे सचिव संजय कमल सदाशिव पासलकर यांनी खानापूर-डोणजे येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालयाच्या ग्रंथालयास सुमारे १५ हजार रुपये किमतीची विविध पुस्तके भेट दिली. कै. सौ. कमल सदाशिव पासलकर आणि कै. श्रीमती रतन मधुकर पासलकर यांच्या स्मरणार्थ हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी



संजय पासलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा संदेश विद्यार्थ्यांनी कायम स्मरणात ठेवावा. तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची प्रगती साधावी. पुस्तके ही ज्ञानाची खरी संपत्ती असून, त्यांचे वाचन केल्याने व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. महाराष्ट्र राज्य बालसाहित्य पुरस्कारप्राप्त कवी रमेश तांबे यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रबोधन केले. वृत्तपत्र लेखक व माजी शिक्षक शशिकांत जाधव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, पुस्तक वाचनातून स्वतःला समृद्ध करा, असे आवाहन केले. या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते पंढरीनाथ पासलकर आणि विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सविता पासलकर उपस्थित होत्या. विद्यार्थिनी ऐश्वर्या भंडारी व नंदिनी जाधव यांनी स्वरचित कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका सविता पासलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्येष्ठ शिक्षक शांताराम किवळे, सुनील लोहोकरे, दिपाली चव्हाण, ज्येष्ठ लेखनिक शाम चव्हाण आणि पोपट पायगुडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शांताराम किवळे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापिका सविता पासलकर यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

पुणे–फिनलंड सहकार्याने शाश्वत विकासाला नवी दिशा!

- जलव्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान आणि युवकांच्या कौशल्य विकासावर भर
- महापौर मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकारातून आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या संधींचा शोध
- सांडपाणी पुनर्वापर आणि 'ड्रिंक फ्रॉम टॅप' उपक्रमावर चर्चा



पुणे (दै. आरंभ पर्व)

पुणे शहराचा वाढता विस्तार, पाण्याची वाढती गरज, पर्यावरण संवर्धन आणि युवकांसाठी रोजगाराभिमुख कौशल्य विकास या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पुणे महानगरपालिकेने आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. फिनलंडच्या वाणिज्यदूत पेट्रा थेमन यांनी पुणे महानगरपालिकेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांची सदिच्छा भेट घेतली. या बैठकीत जलव्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर, शाश्वत नागरी नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योगाभिमुख कौशल्य विकास या विषयांवर चर्चा करण्यात आली.

पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या पुढाकारातून झालेल्या या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर, अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे आणि विविध विभागांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पुण्यातील जे. डब्ल्यू. मॅरियट हॉटेलमध्ये झालेल्या या चर्चेत पुणे शहराच्या भविष्यातील विकासासाठी फिनलंडमधील प्रगत तंत्रज्ञान आणि कार्यपद्धतींचा उपयोग करण्याच्या शक्यतांचा आढावा घेण्यात आला. शहराचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारापुरता मर्यादित न राहता नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणारा असला पाहिजे, अशी भूमिका महापौर मंजुषा नागपुरे यांनी मांडली. पाणी संवर्धन, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर, पर्यावरण संरक्षण आणि दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यावर त्यांनी भर दिला. फिनलंडमधील जलव्यवस्थापनाच्या यशस्वी प्रयोगांचा अभ्यास करून पुण्यात त्यांची उपयुक्तता तपासण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. यासाठी पुणे महानगरपालिकेच्या अभियंत्यांच्या संभाव्य अभ्यासभेटी आयोजित करण्याबाबतही स्वारस्य दर्शविण्यात आले. पुण्यासारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरात सुरक्षित आणि दर्जेदार पाणीपुरवठा सुनिश्चित करणे हे महत्त्वाचे आव्हान आहे. पाणीपुरवठा व्यवस्थेची गुणवत्ता सुधारणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर वाढविणे आणि उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर करणे, या बाबींवर बैठकीत विशेष चर्चा झाली.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पुण्याचा सांस्कृतिक वारसा, शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, औद्योगिक क्षमता आणि वेगाने होणारा नागरी विस्तार यांची माहिती दिली. तसेच, 'ड्रिंक फ्रॉम टॅप' उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील आधुनिक तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. पुण्याची ओळख शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून आहे. मात्र, उद्योगांच्या बदलत्या गरजांनुसार कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या 'लाइटहाउस' कौशल्य विकास केंद्रांची भूमिका बैठकीत अधोरेखित करण्यात आली. अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर यांनी शहरातील गुंतवणुकीच्या संधी, उद्योगांसाठी उपलब्ध असलेली एकखिडकी मंजुरी व्यवस्था आणि पायाभूत सुविधांची माहिती दिली. लाइटहाउस केंद्रांमार्फत युवकांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जात असून, फिनलंडमधील उद्योग आणि पुण्यातील प्रशिक्षित युवक यांच्यात समन्वय साधण्याच्या शक्यतांवर चर्चा झाली. पेट्रा थेमन यांनी भविष्यात लाइटहाउस कौशल्य विकास केंद्राला भेट देण्याची इच्छाही व्यक्त केली. फिनलंडकडे अभियांत्रिकी, डिजिटल तंत्रज्ञान आणि औद्योगिक उपाययोजनांमध्ये असलेले प्रगत कौशल्य पुण्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकते, असे पेट्रा थेमन यांनी नमूद केले. उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, प्रशिक्षित मनुष्यबळ टिकवून ठेवणे आणि भारत–फिनलंड आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी संवाद वाढविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी जमीन वापराचे नियोजन, वाढत्या नागरी विस्तारामुळे निर्माण होणारी आव्हाने आणि वृक्षारोपणासाठी उपलब्ध असलेल्या मर्यादित जागेचा मुद्दा मांडला. तसेच, फिनलंडमधील कंपन्यांना महापालिकेच्या युवक कौशल्य विकास उपक्रमांशी जोडून उद्योगांना आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याच्या संधींवर भर दिला.

चर्चेचे प्रत्यक्ष कृतीत रूपांतर महत्त्वाचे

पुणे–फिनलंड सहकार्याच्या माध्यमातून जलव्यवस्थापन, सांडपाणी पुनर्वापर, शाश्वत नागरी नियोजन आणि कौशल्य विकास या क्षेत्रांत नवीन संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. मात्र, अशा आंतरराष्ट्रीय बैठकांचे खरे यश केवळ चर्चेपुरते मर्यादित न राहता ठोस कृती आराखडा, कालमर्यादा आणि प्रत्यक्ष परिणामांतून दिसून आले पाहिजे. पाण्याचा कार्यक्षम वापर, सुरक्षित पाणीपुरवठा, पर्यावरणपूरक नागरी सुविधा आणि युवकांना रोजगारक्षम बनविणारे प्रशिक्षण या क्षेत्रांत ठोस प्रगती साधता आली, तर या सहकार्याचा पुणेकरांना प्रत्यक्ष लाभ होऊ शकतो. महापौर मंजुषा नागपुरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेला हा संवाद पुण्याच्या शाश्वत विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतो. आता या चर्चेतून कोणते प्रकल्प पुढे येतात, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा केला जातो आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात कोणते सकारात्मक बदल घडतात, याकडे पुणेकरांचे लक्ष असेल.

थोडक्यात पण महत्वाचे



इसुझू मोटर्स इंडियाच्या वतीने सर्वोत्तम निर्मितीची १० वर्षे साजरी

चेन्नई (आरंभ पर्व) : जपानमधील इसुझू मोटर्स लिमिटेडची उपकंपनी असलेल्या इसुझू मोटर्स इंडियाने (आयएमआय) आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील आपल्या आधुनिक उत्पादन सुविधेत भारतातील वाहनांच्या निर्मितीचे दशक साजरे केले. एप्रिल 2016 मध्ये शुभारंभ करण्यात आलेले इसुझूचे हे सुविधाकेंद्र म्हणजे देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठेसाठी एक प्रमुख मोनोझुकुरी उत्पादन केंद्र म्हणून विकसित झाले आहे. हा प्रवास भारतातील उत्पादनासाठी इसुझू'ची वचनबद्धता तसेच भारतासाठी आणि मध्य पूर्व (सौदी अरेबिया, बहरीन, कतार, कुवेत, ओमान आणि जॉर्डन) आणि आशिया (नेपाळ, भूतान आणि बांगलादेश) यासारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसह जगासाठी जागतिक स्तरावर दर्जेदार उत्पादने वितरीत करण्याचे त्याचे तत्वज्ञान प्रतिबिंबित करतो. जपानच्या इसुझू मोटर्स लिमिटेडचे प्रेसिडेंट आणि रिप्रेझेंटेटीव्ह डायरेक्टर, सीईओ नाओहिरो यामागुची आणि जपानच्या मित्सुबिशी कॉर्पोरेशनच्या मोबिलिटी ग्रुपचे ग्रुप सीईओ शिगेरू वाकाबायाशी हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. आंध्र प्रदेश सरकारचे उद्योग आणि वाणिज्य सचिव डॉ. एन.युवाराज, आयएएस त्याचप्रमाणे श्री सिटीचे संस्थापक आणि मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. रवींद्र सन्ना रेड्डी यांच्यासह इतर मान्यवर आणि आयएमआयचे प्रतिनिधी सदस्य उपस्थित होते.

दिवाळी सणासाठी 'आनंदाचा शिधा' तातडीने जाहीर करा : महेश पोकळे

- सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने त्वरित निर्णय घ्यावा : पोकळे

पुणे (आरंभ पर्व) : दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून वितरित करण्यात येणाऱ्या 'आनंदाचा शिधा'बाबतचा निर्णय तातडीने जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खडकवासला विधानसभा मतदारसंघातील विभागप्रमुख महेश पोकळे यांनी राज्य शासनाकडे केली आहे. यासंदर्भात पोकळे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवले आहे. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून यापूर्वी दिवाळीच्या सणानिमित्त राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना 'आनंदाचा शिधा' वितरित करण्यात येत होता. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि सर्वसामान्य कुटुंबांना दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी मदत मिळत होती. मात्र, यंदा दिवाळी जवळ आली असतानाही आनंदाचा शिधा वाटपाबाबत शासनाचा निर्णय जाहीर झालेला नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दिवाळी हा सर्वसामान्यांच्या आनंदाचा आणि उत्साहाचा सण आहे. महागाईच्या पार्श्वभूमीवर गोरगरीब कुटुंबांना सण साजरा करताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारा आनंदाचा शिधा त्यांच्यासाठी महत्त्वाचा आधार ठरतो. त्यामुळे राज्य शासनाने नागरिकांच्या अपेक्षांचा विचार करून आनंदाचा शिधा वाटपाबाबतचा निर्णय तातडीने जाहीर करावा आणि पात्र लाभार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल, यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही महेश पोकळे यांनी केली आहे.

एशियन पेंट्स 'तैय्यारी शुरू, त्योहार शुरू' सोबत साजरा करत आहे आनंद



पुणे (आरंभ पर्व) : दिवाळीचा खरा उत्साह साजरा करत, एशियन पेंट्स सादर करत आहे 'तैय्यारी शुरू, त्योहार शुरू'. ही एक म्युझिकल ॲड फिल्म आहे, जी दाखवते की दिवाळीची खरी सुरुवात तर घरातल्या तयारीनेच होते. दिवाळीचा उत्साह सण येण्याच्या खूप आधीच सुरू होतो. घराची साफसफाई आणि सजावटीपासून ते घराला नवीन रंगाचा फ्रेश कोट देण्यापर्यंत, प्रत्येक काम सणाच्या तयारीचा एक भाग बनून जातं. जेव्हा कुटुंब, भाऊ-बहिण, नातेवाईक आणि मित्र-मैत्रिणी दिवाळीसाठी त्यांची घरे तयार करायला एकत्र येतात, तेव्हा रोजची साधी कामं सुद्धा कशी हास्यविनोदाचे आणि एकत्र येण्याचे क्षण बनतात, हे या फिल्ममध्ये दाखवलं आहे. ही कॅम्पेन दिवाळीच्या तयारीतील उत्साह एका रंगीबेरंगी म्युझिकलमधून जिवंत करते. यात एक आकर्षक,पावले थिरकायला लावणारी धून आणि मजेशीर गाणी आहेत. एशियन पेंट्सने भिंती रंगवण्यापासून ते साफसफाई आणि सजावटीपर्यंत, प्रत्येक तयारीला एका जिवंत साजरेपणात बदलताना ही फिल्म दाखवते, ज्यात कुटुंबे आपल्या प्रियजनांच्या स्वागतासाठी घर तयार करत आहेत.

आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या नफ्यात १९६.५% वाढ

मुंबई (दै. आरंभ पर्व)

आयडीएफसी फर्स्ट बँकेने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या दुसऱ्या तिमाहीत दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीत बँकेचा करपश्चात निव्वळ नफा (पीएटी) वार्षिक तुलनेत १९६.५ टक्क्यांनी वाढून १,०४५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, सलग दुसऱ्या तिमाहीत बँकेने एक हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निव्वळ नफा नोंदवला आहे. आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत बँकेचा एकूण निव्वळ नफा २,१२० कोटी रुपये झाला असून, या कालावधीत मालमत्तेवरील परतावा (आरओए) ०.९९ टक्के नोंदवण्यात आला आहे. बँकेच्या नफ्यातील वाढीसोबतच ठेवींचे संकलन, कर्जवाटप आणि परिचालन कार्यक्षमतेतही सुधारणा झाल्याचे तिमाही निकालांतून स्पष्ट झाले आहे.बँकेच्या एकूण ठेवींमध्ये वार्षिक तुलनेत २५.९ टक्के, तर मागील तिमाहीच्या तुलनेत ११.८ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळे एकूण ठेवी ३,४८,५८३ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत.

धायरी-बेनकर वस्तीतील ऋतूनगरीत १९ वे 'जनसंवाद अभियान' उत्साहात

नागरी समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या नगरसेवक हरिदास चरवड यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

धायरी (दै. आरंभ पर्व)

नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेऊन त्यांचे प्रभावी निराकरण करण्याच्या उद्देशाने नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणारे १९ वे 'जनसंवाद अभियान' धायरी-बेनकर वस्तीतील ऋतूनगरी परिसरात उत्साहात पार पडले. या अभियानात नागरिकांनी विविध नागरी समस्या मांडल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



या अभियानाला परिसरातील विविध सोसायट्यांचे पदाधिकारी, स्थानिक नागरिक आणि औद्योगिक केंद्र म्हणून आहे. मात्र, उद्योगांच्या बदलत्या गरजांनुसार कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या 'लाइटहाउस' कौशल्य विकास केंद्रांची भूमिका बैठकीत अधोरेखित करण्यात आली. अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर यांनी शहरातील गुंतवणुकीच्या संधी, उद्योगांसाठी उपलब्ध असलेली एकखिडकी मंजुरी व्यवस्था आणि पायाभूत सुविधांची माहिती दिली. लाइटहाउस केंद्रांमार्फत युवकांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जात असून, फिनलंडमधील उद्योग आणि पुण्यातील प्रशिक्षित युवक यांच्यात समन्वय साधण्याच्या शक्यतांवर चर्चा झाली. पेट्रा थेमन यांनी भविष्यात लाइटहाउस कौशल्य विकास केंद्राला भेट देण्याची इच्छाही व्यक्त केली. फिनलंडकडे अभियांत्रिकी, डिजिटल तंत्रज्ञान आणि औद्योगिक उपाययोजनांमध्ये असलेले प्रगत कौशल्य पुण्याच्या विकासासाठी उपयुक्त ठरू शकते, असे पेट्रा थेमन यांनी नमूद केले. उद्योगांच्या गरजांनुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, प्रशिक्षित मनुष्यबळ टिकवून ठेवणे आणि भारत–फिनलंड आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी संवाद वाढविणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अतिरिक्त महापालिका आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी जमीन वापराचे नियोजन, वाढत्या नागरी विस्तारामुळे निर्माण होणारी आव्हाने आणि वृक्षारोपणासाठी उपलब्ध असलेल्या मर्यादित जागेचा मुद्दा मांडला. तसेच, फिनलंडमधील कंपन्यांना महापालिकेच्या युवक कौशल्य विकास उपक्रमांशी जोडून उद्योगांना आवश्यक असलेले प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याच्या संधींवर भर दिला.

पहाणी करण्यात आली. प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशा सूचना नगरसेवक हरिदास चरवड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नागरिकांना आपल्या समस्या थेट मांडता याव्यात आणि त्यांचे वेळेत निराकरण व्हावे, या उद्देशाने दर रविवारी विविध परिसरांत 'जनसंवाद अभियान' राबविण्यात येते. या उपक्रमामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद वाढत असून, स्थानिक प्रश्नांच्या निराकरणासाठी थेट पाठपुरावा करणे शक्य होत आहे. नागरी समस्यांना प्राधान्य देऊन त्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते तुषार श्रीहरी पोकळे, प्रकाश गुरव, नंदकिशोर गोसावी यांच्यासह प्रशासनातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी ,विविध सोसायटी मधील चेअरमन रहिवासी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळांना बालसाहित्य संच भेट



राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)

येथील सार्वजनिक वाचनालयात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यानिमित्त पुस्तक प्रदर्शन तसेच जिल्हा परिषद शाळांना बाल साहित्यांचे संच भेट देण्यात आले. माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी वाचनालयाने खरेदी केलेल्या व भेट मिळालेल्या पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन देशमुख यांच्या हस्ते झाले. खेड तालुक्यातील राक्षेवाडी, चांदूस, आंबेठाण व गणेशखिंड या जिल्हा परिषद शाळांना ४४ बाल साहित्य संचाचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या शाळांचे विद्यार्थी व शिक्षकांनी हे संच स्विकारले. याप्रसंगी बोलताना देशमुख म्हणाले, वाचनसंस्काराचे संस्कार बालवयात विद्यार्थ्यांवर झाले पाहिजेत.

सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम

मानवी जीवन सफल करण्यासाठी व सर्वांगीण विकासासाठी वाचनाचे महत्व अबाधीत आहे. असे सांगुन वाचनालयाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासूनसून राबवित असलेल्या स्युत उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

याप्रसंगी डॉ.आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त गोविंद बुट्टे, वाचनालयाचे अध्यक्ष प्रमोद गानू, सचिव राजेंद्र सुतार, राजेंद्र सांडभोर, सदाशीव आमराळे, राजेश लाडके, बाबासाहेब गायकवाड, रामचंद्र शिंगाडे, दिलीप शेळकंदे, रोहिदास येळवंडे, संतोष मांडेकर, अशोक डोंगरे, मिलींद शिंदे, सागर राक्षे, कल्पना गवळी, प्रतिक्षा बांगर, शितल बनकर, मयुरी कवडे व वाचनप्रेमी नागरीक उपस्थित होते.

मानवी दुग्धपेढी व्यवस्थापनाला तंत्रज्ञानाची जोड

पुणे (दै. आरंभ पर्व)

- व्हिक्चुअल्स लाइफसायन्सेसकडून डिजिटल सॉफ्टवेअर विकसित

नवजात बालकांच्या आरोग्यसेवेत मानवी दुग्धपेढ्यांचे महत्त्व वाढत असताना, पुणेस्थित व्हिक्चुअल्स लाइफसायन्सेसने मानवी दुग्धपेढ्यांचे व्यवस्थापन अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्यासाठी डिजिटल सॉफ्टवेअर विकसित केले आहे. 'व्हिक्चुअल्स ह्युमन मिल्क बँक सॉफ्टवेअर'च्या माध्यमातून दूध संकलन, प्रक्रिया, पाश्चरायझेशन, साठवणूक आणि वितरण या संपूर्ण प्रक्रियेचे डिजिटल व्यवस्थापन व दुधाचा मागोवा घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुदतपूर्व जन्मलेली, कमी वजनाची किंवा वैद्यकीयदृष्ट्या नाजूक स्थितीतील अर्भके, ज्यांच्या मातांकडून पुरेशा प्रमाणात स्तन्य उपलब्ध होऊ शकत नाही, अशा परिस्थितीत दात्यांकडून मिळणारे मानवी दूध महत्त्वाचे ठरते. त्यामुळे मानवी दुग्धपेढ्यांमध्ये दूधदात्यांची नोंदणी व तपासणी, दूध संकलन, प्रयोगशाळा चाचण्या, पाश्चरायझेशन, साठवणूक आणि पात्र अर्भकांना वितरण अशा अनेक प्रक्रियांचे अचूक व्यवस्थापन आवश्यक असते. पारंपरिक पद्धतीमध्ये या प्रक्रियांपैकी अनेक बाबी कागदपत्रे आणि हाताने नोंदी ठेवण्यावर अवलंबून असतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कामकाज सुरू असताना नोंदींचे व्यवस्थापन, प्रक्रियांचा मागोवा आणि लेखापरीक्षण यामध्ये अडचणी निर्माण होऊ शकतात.

विशेष स्टीलमुळे भारतीय नौदलाची पाणबुडीविरोधी युद्धक्षमता मजबूत

नवी दिल्ली : (दै. आरंभ पर्व)



भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतांना अधिक बळकटी देण्याच्या प्रयत्नांदरम्यान, आर्सेलरमित्तल निप्पॉन स्टील इंडिया (AM/NS India) ने देशाच्या नौदल आधुनिकीकरणाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय नौदलाच्या माहे-क्लासमधील तिसऱ्या अँटी-सबमरीन वॉरफेअर शॅलो वॉटर क्राफ्ट (ASW-SWC) INS मंगरोलला नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले आहे. AM/NS इंडियाने पुरवलेल्या 100% विशेष स्टीलपासून तयार करण्यात आलेल्या INS मंगरोलला 12 ऑक्टोबर 2026 रोजी मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे भारतीय नौदलाच्या सेवेत दाखल करण्यात आले. ही उपलब्धी भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राला आणि सागरी सुरक्षेला बळकटी देण्यात प्रगत भारतीय स्टील उत्पादनाचे वाढते योगदान अधोरेखित करते. AM/NS इंडियाचे संचालक आणि उपाध्यक्ष – विक्री व विपणन, श्री. रंजन धर म्हणाले, "INS मंगरोलचा नौदलात समावेश हा भारताच्या संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे. आधुनिक नौदल प्लॅटफॉर्मच्या निर्मितीसाठी सर्वोच्च दर्जाचे आणि विश्वासार्ह विशेष स्टील आवश्यक असते. AM/NS इंडियाचे स्टील भारतीय नौदलाच्या आधुनिकीकरणाला हातभार लावत असून भारताच्या उत्पादन क्षमतेची ताकद अधोरेखित करत आहे, याचा आम्हाला अभिमान आहे."

हक्काच्या रस्त्याच्या लढ्याला यश

- नागरिकांनी एकत्रित जल्लोष केला!
- १५ वर्षांच्या संघर्षाला यश
- ३२ सोसायट्यांतील नागरिकांना दिलासा मिळण्याची आशा

नऱ्हे, पुणे (दै. आरंभ पर्व)



मानाजीनगर येथील १२ मीटर रुंदीच्या मंजूर रस्त्याचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याने परिसरातील नागरिकांनी एकत्रित जल्लोष केला. आपल्या हक्काचा रस्ता संघर्ष समितीने गेल्या १५ वर्षांपासून केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मानाजीनगर येथील मंजूर रस्त्यावर ग्रीनलँड कंट्री सोसायटीने सीमा भिंत, गणपती मंदिर आणि गेट उभारून रस्ता अडविल्याचा आरोप संघर्ष समितीने केला होता. त्यामुळे परिसरातील सुमारे ३२ सोसायट्यांमधील नागरिकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. हा प्रश्न सोडवण्यासाठी सन २०११ पासून संघर्ष समितीने विविध शासकीय कार्यालयांमध्ये पाठपुरावा केला. तसेच, या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयातही कायदेशीर लढा देण्यात आला. २३ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानंतर या प्रकरणाला गती मिळाली. त्यानंतर संघर्ष समितीचे अध्यक्ष रोहिदास जोरी यांनी पुणे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. रस्त्यातील सीमा भिंत, मंदिर आणि गेट यांसंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यासाठी संबंधित सोसायटीला चार आठवड्यांच्या आत कार्यवाही करण्याबाबत नोटीस देण्यात आल्याची माहिती समितीने दिली. या निर्णयानंतर २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता साद सोसायटीसमोरील सीमा भिंतीजवळ मानाजीनगरमधील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले. यावेळी नागरिकांनी एकत्रित जल्लोष करत आनंद व्यक्त केला. संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या लढ्याचे कौतुक केले.

या संघर्षात समितीचे अध्यक्ष रोहिदास जोरी, उपाध्यक्ष भानुदास साठे, खजिनदार सूर्यकांत चव्हाण यांच्यासह अनंत कणबरकर, सचिन हेरवडे, चंद्रकांत काळंगे, नितीन घोलप, प्रशांत पाटील, प्रवीण वाली, नितीन खटावकर, संदीप साळुंखे, संदीप जायभाय, मयूर धनवट, अमोल फासे, प्रवीण पाटील आणि मीडिया रेजन्सी सोसायटी यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. दरम्यान, महानगरपालिकेच्या निर्णयामुळे रस्त्याचा प्रश्न मार्गी लागण्याची आशा निर्माण झाली असली, तरी प्रत्यक्ष रस्ता खुला होणे बाकी आहे. ३२ सोसायट्यांतील नागरिकांना हक्काचा रस्ता वापरण्यास मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचा निर्धार संघर्ष समितीने व्यक्त केला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



तेराव्या गोवा लघुपट महोत्सवात कुस ठरला सर्वोत्कृष्ट मराठी लघुपट

पुणे (आरंभ पर्व) : ऊसतोड कामगारांचे विदारक जीवन वास्तविकपणे पडद्यावर दाखविणाऱ्या जीवराज चोले आणि उचित मीडिया सर्विसेस निर्मित आणि ज्ञानेश्वर जाधवर दिग्दर्शित कुस या लघुपटाला ला सर्वोत्कृष्ट मराठी लघुपट म्हणून गौरविण्यात आले यात लघुपटाला मराठी विभागामध्ये ज्ञानेश्वर जाधवर यांना सर्वोत्कृष्ट पटकथा लेखनाचे पारितोषिक मिळाले अक्षय व्यवहारे दिग्दर्शित मिटर डाऊन हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला, तर तिसऱ्या या लघुपटासाठी श्रेयस लाड यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक मिळाले . पंकी या लघुपटासाठी राहुल राठोड यांना सर्वोत्कृष्ट पटकथा लेखक म्हणून गौरविण्यात आले. मराठी चित्रपट परिवार संस्थेतर्फे पुण्यातील सारसबागेजवळील बाळासाहेब ठाकरे व्यंगचित्र कलादालन सभागृहामध्ये महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. जेष्ठ संगीत समीक्षक सुभाषचंद्र जाधव, ज्येष्ठ लेखक मनोहर सप्रे, विनायक कुलकर्णी, ज्येष्ठ छायाचित्रकार आनंद चैनी यांच्या हस्ते महोत्सवाचे पारितोषिक वितरण करण्यात आले. महोत्सवाचे संचालक योगेश बारस्कर यावेळी उपस्थित होते. द ट्रॅप या लघुपटासाठी रामकुमार शेडगे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून पारितोषिक मिळाले. आंतरराष्ट्रीय विभागामध्ये जेम्स उगस दिग्दर्शित द नमो फुगे लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला तर डिस्टन्स वॉटर्स या लघुपटासाठी स्टील ब्युटी यांना सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दिग्दर्शक म्हणून गौरवण्यात आले आणि द लास्ट डेट या लघुपटासाठी रासकी निवरा यांना सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय पटकथा लेखक म्हणून पारितोषिक मिळाले. भारतीय विभागामध्ये माय बिलवड मुक्कू हा लघुपट सर्वोत्कृष्ट ठरला तर भारत पाटील यांना अनुबौंड साऊंड या लघुपाठासाठी सर्वोत्कृष्ट भारतीय दिग्दर्शक म्हणून गौरविण्यात आले.



रेड लाइन-ब्लू लाइन प्रश्नावर तोडग्यासाठी 'बीएआय'चा पुढाकार

पुणे (आरंभ पर्व) : रेड लाइन-ब्लू लाइन निर्बंधांमुळे रखडलेल्या बांधकाम परवानग्या आणि पुनर्विकास प्रकल्पांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाने (बीएआय) पुढाकार घेतला आहे. गुजरातच्या धर्तीवर महाराष्ट्राच्या एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत (यूडीसीपीआर) सुधारणा करून पात्र प्रकरणांतील बांधकाम परवानग्यांचा मार्ग मोकळा करावा, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. 'बीएआय'चे सदस्य व राष्ट्रपती पुरस्कार विजेते राम (नंदकिशोर) पातकर यांच्या नेतृत्वाखाली 'बीएआय'चे पदाधिकारी व बांधकाम क्षेत्रातील प्रतिनिधींनी पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि नगररचना विभागाचे संचालक जितेंद्र भोपळे यांची भेट घेऊन या प्रश्नावर चर्चा केली. रेड लाइन-ब्लू लाइन निर्बंधांमुळे नागरिकांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असून, जुन्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासातही अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यावेळी 'बीएआय'चे माजी उपाध्यक्ष आनंद गुप्ता, बीएआय पुणे सेंटरचे सचिव महेश राठी, महाराष्ट्र 'युडीसीपीआर' समितीच्या सह-अध्यक्ष ज्योती चौगुले, पदाधिकारी मिहिर पायलेकर, लक्ष्मण विसपुते आदी उपस्थित होते. 'यूडीसीपीआर'मधील कलम ३.१.३ आणि ११.२.८ यांचा पुनर्विचार करून आवश्यक सुधारणा कराव्यात, तसेच संबंधित समितीचा अहवाल शासनाकडे लवकर सादर करावा, अशी मागणी करण्यात आली.



असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ प्लास्टिक्सच्या कार्यालयाचे उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ प्लास्टिक्स (एपीपी) या संस्थेच्या औंध येथील वेस्ट अव्हेन्यू येथे नवीन कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. प्लास्टिक उद्योगाच्या विकासाला चालना देणे तसेच संस्थेच्या सदस्यांमधील समन्वय आणि सहकार्य अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हे कार्यालय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नवीन कार्यालयाचे उद्घाटन अभिनेते प्रवीण तरडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एपीपीचे अध्यक्ष अनिल नाईक, चेअरमन अजय झोड, खजिनदार प्रणव बेल्हेकर, सचिव समीर कोठारी, माजी अध्यक्ष अरुण कुंभोजकर, राज मिरजे आणि अमित मेहता यांच्यासह संस्थेचे सदस्य आनंद कुंभोजकर आदी मान्यवर उपस्थित होते. एपीपीचे अध्यक्ष अनिल नाईक म्हणाले, "या नवीन कार्यालयामुळे संस्थेच्या कामकाजात अधिक सुसूत्रता येण्यास मदत होईल. तसेच सदस्यांमधील संवाद, समन्वय आणि विविध उपक्रमांच्या नियोजनासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध होईल. प्लास्टिक उद्योगाशी संबंधित विविध घटकांना एकत्र आणून उद्योगाच्या प्रगतीसाठी सामूहिक प्रयत्न करण्यावर संस्थेचा भर राहणार आहे. याशिवाय, देशातील प्लास्टिक उद्योगाचे सर्वात मोठे प्रदर्शन असलेल्या व नोव्हेंबर 2027 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या संस्थेच्या महत्त्वाकांक्षी 'प्लास्टो' प्रदर्शनाच्या नियोजन आणि समन्वयासाठीही हे कार्यालय उपयुक्त ठरणार आहे."

'एआय'मुळे वेगाने प्रगती होणार; प्रत्येकाने तंत्रज्ञान शिकण्याची गरज

डॉ. गिरीश देसाई यांचे प्रतिपादन; विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये 'डीपएंट्रा अकॅडमी'च्या एआय प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

पुणे (दै. आरंभ पर्व)

"कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे केवळ तंत्रज्ञानातील परिवर्तन नसून शिक्षण, उद्योग, व्यवसाय आणि दैनंदिन जीवनातील प्रगतीला गती देणारे प्रभावी साधन ठरत आहे. आगामी काळात प्रत्येक क्षेत्रात एआयचा वापर वाढणार असून, बदलत्या युगात टिकून राहण्यासाठी प्रत्येकाने हे तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड विद्यापीठाचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी केले. विद्यार्थी साहाय्यक समिती येथे डीपएंट्रा एआय अकॅडमी आणि स्टुडंट वेलफेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विद्यार्थी साहाय्यक समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ उद्योजक पद्मश्री प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त तुकाराम गायकवाड, प्रीती राव, संचालक गौतम सातपुते, 'डीपएंट्रा'च्या दीपाली कुलकर्णी, सल्लागार महेश बक्षी आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. गिरीश देसाई म्हणाले, "एआयचा प्रभावी वापर करणाऱ्या संस्था आणि उद्योगांना भविष्यात प्रगतीच्या अधिक संधी उपलब्ध होतील. शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया, अध्यापन, अध्ययन, प्रशासकीय कामकाज ते रोजगारनिर्मिती अशा विविध क्षेत्रांत एआयमुळे मोठे बदल घडत आहेत. मात्र तंत्रज्ञानाचा केवळ वापर करण्यापेक्षा त्याचा सकारात्मक, जबाबदार आणि सर्जनशील पद्धतीने उपयोग करणे अधिक महत्त्वाचे आहे. एआयच्या माध्यमातून भविष्यातील नव्या संधी निर्माण करण्याची क्षमता प्रत्येकामध्ये आहे." प्रतापराव पवार म्हणाले, "विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता उत्कृष्टतेचा ध्यास घेतला पाहिजे. बदलत्या काळातील नवे तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतःला सातत्याने अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. योग्य संधी, मार्गदर्शन आणि पोषक वातावरण मिळाल्यास सामान्य कुटुंबातील विद्यार्थीदेखील असामान्य कामगिरी करू शकतात. विद्यार्थी साहाय्यक समितीतून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वासाने परिपूर्ण असावा, हा आमचा प्रयत्न आहे." महेश बक्षी म्हणाले, "पारंपरिक शिक्षण आणि उद्योगक्षेत्राच्या प्रत्यक्ष गरजा यांमध्ये आजही मोठी दरी आहे. विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान न देता प्रत्यक्ष प्रकल्प, आधुनिक तंत्रज्ञान आणि समस्या सोडवण्याच्या कौशल्यांवर आधारित प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण होताच उद्योगक्षेत्रात प्रभावीपणे काम करता यावे, या उद्देशाने हा उपक्रम महत्वाचा आहे. ग्रामीण भागातील युवकांपर्यंत एआय पोहोचले, तर देशाच्या सर्वांगीण प्रगतीला मोठी चालना मिळेल."



दीपाली कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात डीपएंट्रा एआय अकॅडमीच्या 'एआय फॉर ऑल - कृत्रिम बुद्धिमत्ता सर्वांसाठी' या संकल्पनेची माहिती दिली. कृत्रिम बुद्धिमत्ता शिकण्यासाठी विशिष्ट वय, शैक्षणिक शाखा किंवा तांत्रिक पार्श्वभूमी असण्याची आवश्यकता नाही. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, शिक्षक, गृहिणी, नोकरदार व्यावसायिक, उद्योजक, कॉर्पोरेट क्षेत्रातील कर्मचारी, कृषीक्षेत्रात, आणि ज्येष्ठ नागरिक कोणीही हे शिकू शकते.

गौतम सातपुते यांनी विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. "विद्यार्थ्यांना केवळ निवास आणि भोजनाची सुविधा उपलब्ध करून देणे एवढ्यापुरते समितीचे कार्य मर्यादित नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक, व्यावसायिक आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवण्यासाठी समिती सातत्याने प्रयत्नशील आहे," असे त्यांनी सांगितले. पर्सिस्टंट सिस्टम्सचे हेल्थकेअर अँड लाईफ सायन्सेस विभागाचे प्रमुख संतोष दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले. तुषार रंजनकर व तुकाराम गायकवाड यांनी आभार मानले.

'चिन्मय मिशन'चा तीन दिवसीय जागतिक संमेलनाचा समारोप

- चिन्मय चळवळीच्या ७५ वर्षांच्या प्रवासाचा भव्य उत्सव

नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)

चिन्मय मिशनने आज नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित तीन दिवसीय चिन्मय अमृत महोत्सव जागतिक संमेलनाचा समारोप केला. चिन्मय चळवळीच्या ७५ वर्षांच्या पूर्ततेनिमित्त वर्षभर आयोजित करण्यात आलेल्या उत्सवांचा हा समारोप होता. भारतासह परदेशातून आलेल्या ९,००० हून अधिक सहभागींच्या उपस्थितीत पार पडलेल्या या संमेलनात पूज्य गुरुदेव स्वामी चिन्मयानंद यांच्या चिरंतन वारशाचा गौरव करण्यात आला. आध्यात्मिक प्रवचने, सांस्कृतिक सादरीकरणे, विविध पिढ्यांमधील संवाद आणि प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित उपक्रमांच्या माध्यमातून मिशनच्या तात्त्विक विचारांचा समकालीन जीवनाशी संबंध अधोरेखित करण्यात आला. या संमेलनाचे उद्घाटन २३ ऑक्टोबर रोजी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. गुरुदेवांच्या शिकवणी नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी मिशन करत असलेल्या प्रयत्नांची त्यांनी प्रशंसा केली. तसेच, राष्ट्रनिर्मितीमध्ये युवा शक्तीची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. तीन दिवसीय संमेलनाच्या समारोपाच्या दिवशी माननीय परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि भारतातील संयुक्त राष्ट्रांचे निवासी समन्वयक स्टीफन प्रीस्नर यांनीही सहभाग घेतला. याशिवाय, सुमारे ८० राजदूतांच्या मान्यवर प्रतिनिधीमंडळाची उपस्थिती या संमेलनाला लाभली. यावरून या उपक्रमाची आंतरराष्ट्रीय व्याप्ती आणि विविध समुदाय व राष्ट्रांमध्ये संवाद तसेच परस्पर समज वाढविण्यासाठी वेदांत तत्त्वज्ञानाचे असलेले महत्त्व स्पष्ट झाले.

संस्कार प्रायमरी ॲण्ड हायस्कूलमध्ये नवरात्रोत्सवाची रंगत

दौंड (दै. आरंभ पर्व)

संस्कार प्रायमरी ॲण्ड हायस्कूल, दौंड येथे सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात दांडिया, गरबा आणि आकर्षक नृत्यप्रस्तुतींनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे देवी दुर्गेची नऊ रूपे साकारलेल्या विद्यार्थिनींचे देखणे सादरीकरण! या कार्यक्रमासाठी शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. यामध्ये संस्कार स्कूलचे संस्थापक मा. श्री. जयंत पवार सर, संचालिका सौ. अरुणा पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. प्रतिभा पवार मॅडम, मुख्याध्यापिका सौ. सुनिता मिनिगी, उपनगराध्यक्षा सौ. छाया थोरात, दौंड सिद्धेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ ठोंबरे, दौंड पंचायत समितीचे विद्यमान सभापती श्री. सुखदेव (भाऊ) चोरमले, नगरसेवक श्री. विजू बोरकर, नगरसेवक श्री. निलेश पवार, शिवव्याख्याते श्री. राहुल शिंदे, पर्यवेक्षक श्री. मंगेश साठे, नृत्यदिग्दर्शक व पर्यवेक्षक श्री. आरव सोनवणे, ॲड. सौ. कावेरी गुरसळ आणि आशा सेविका सौ. शीला वाघमारे यांचा समावेश होता. नवरात्रोत्सवानिमित्त शाळेच्या प्रांगणात सायंकाळी ५ ते ७ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात भारतीय संस्कृती आणि परंपरेचे सुंदर दर्शन घडले. रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध दांडिया-गरबा आणि उत्साहपूर्ण नृत्यप्रस्तुतींमुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.



देवींच्या नऊ रूपांनी वेधले लक्ष!

देवी दुर्गेची नऊ रूपे आकर्षक वेशभूषेत साकारून विद्यार्थिनींनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या सादरीकरणातून देवीशक्तीचे महत्त्व, स्त्रीशक्तीचा गौरव आणि भारतीय संस्कृतीतील नवरात्रोत्सवाचे आध्यात्मिक महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला उपस्थित मान्यवर आणि पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शारदा भोसले आणि महेक गिदवाणी मॅडम यांनी केले, तर सौ. सुनिता गायकवाड यांनी आभार प्रदर्शन करून उपस्थित मान्यवर, पालक आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याबरोबरच त्यांच्यामध्ये सांस्कृतिक मूल्यांची जपणूक, आत्मविश्वास आणि सांघिक भावनेची वाढ होण्यास मदत झाली. शाळा आणि पालक यांच्यातील स्नेहबंध दृढ करणारा हा सोहळा उत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडला. संस्कार प्रायमरी ॲण्ड हायस्कूलच्या या उपक्रमातून शिक्षणासोबतच भारतीय संस्कृती, परंपरा आणि कलात्मक अभिव्यक्ती यांना प्रोत्साहन देण्याचा शाळेचा दृष्टिकोन अधोरेखित झाला.

'एआय'मुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम, प्रभावी व सुसज्ज होईल

- संतोष वारिक यांचे प्रतिपादन
- 'पीएसपी-एएसआयएस कॉन्क्लेव्ह'मध्ये सुरक्षा क्षेत्रातील 'एआय'च्या वापरावर चर्चा

पुणे (दै. आरंभ पर्व)

"कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) वापरामुळे सुरक्षा यंत्रणांमधील देखरेख आणि नियंत्रण अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून होणाऱ्या निरीक्षणामध्ये एआय तंत्रज्ञानाचा वापर केल्यास संशयास्पद हालचाली ओळखण्यासह संभाव्य धोके वेळीच लक्षात घेऊन तातडीने प्रतिसाद देणे शक्य होईल," असे प्रतिपादन महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचे संचालक व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अग्निशमन अधिकारी संतोष वारिक यांनी केले. 'एआय'मुळे सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम, प्रभावी आणि सुसज्ज होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पुणे सिक्युरिटी प्रोफेशनल्स व अमेरिकन सोसायटी फॉर इंडस्ट्रियल सिक्युरिटी (एएसआयएस) यांच्या संयुक्त विद्यमाने 'एआय इन सिक्युरिटी' संकल्पनेवर 'पीएसपी-एएसआयएस कॉन्क्लेव्ह'चे आयोजन केले होते. यामध्ये 'अग्निसुरक्षेमध्ये एआयचा वापर' यावर वारिक बोलत होते. मुंबईतील आयकॉनिका हॉटेल येथे झालेल्या कार्यक्रमावेळी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयाचे सहसंचालक किरण हत्याल, 'पीएसपी'चे सहसंस्थापक सुनील बीडलम व मंगेश काटे, बँक ऑफ बडोदाच्या सुरक्षा विभागाचे राष्ट्रीय प्रमुख ब्रिगेडियर प्रीतपाल सिंग, सिक्युरिटी शेल्स इंफोटेकचे संचालक महेश गव्हाणे, बायॉन अनॅलिटीक्सचे व्यवस्थापकीय संचालक राजीव नायर, सुरक्षा सेवा क्षेत्रातील प्रमुख अधिकारी नंदकिशोर भट, मोहित भूगणि, कुणाल भोगल, स्वप्नील कुटे, सुमित शहा, ब्रिगेडियर सुनील कुमार, सिमएक्सचे पूर्वेस गडा, 'एएसआयएस' मुंबई चॅप्टरचे समीर कुमार झा, मार्श मिरांडा, प्रमोद भिलारे, राकेश खेरवा, संपत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. एचएसबीसी बँक इंडियाचे उपाध्यक्ष (प्रोटेक्टिव्ह सिक्युरिटी) निलेश गाडेकर व हॉटेल ग्रँड हयात मुंबईचे सहायक सुरक्षा व्यवस्थापक संतोष भालके यांना सुरक्षा सेवा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले. संतोष वारिक म्हणाले, "सद्यस्थितीत इमारतींची सुरक्षा आणि आगीपासून बचाव (फायर सेफ्टी) या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या बनल्या आहेत. कारखाने, कार्यालये किंवा मॉलमध्ये लोकांच्या गर्दीवर लक्ष ठेवण्यासह संपूर्ण व्यवस्थापन 'एआय'च्या माध्यमातून करणे शक्य झाले आहे. तसेच, इमारतींमधील आगीच्या सुरक्षेच्या यंत्रणांवरही 'एआय'द्वारे नजर ठेवता येणे सहज शक्य आहे.



ह्युंडाई मोटर इंडियाकडून ह्युंडाई बेयॉन ९,९९,९०० रुपये किमतीमध्ये लाँच

पुणे (दै. आरंभ पर्व)

ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडने (एचएमआयएल) आज "इंटेलिजन्स दॅट मूव्हज" तत्त्वज्ञानावर आधारित इंटेलिजंट युटिलिटी वेईकल ह्युंडाई बेयॉन 9,99,900 रुपये (एक्स-शोरूम) या सुरुवातीच्या किमतीत लाँच केली. नाविन्यता, तंत्रज्ञान आणि दैनंदिन वैविध्यतेचा परिपूर्ण संगम शोधणाऱ्या आधुनिक ग्राहकांसाठी डिझाइन केलेली ह्युंडाई बेयॉन फ्युचर-रेडी कनेक्टिव्हिटी, प्रगत सुरक्षा यंत्रणा, प्रीमियम आरामदायीपणा आणि दमदार परफॉर्मन्स यांना एकत्र आणत खऱ्या अर्थाने इंटेलिजंट मोबिलिटी अनुभव देते. ह्युंडाई बेयॉनच्या लाँचबाबत मत व्यक्त करत ह्युंडाई मोटर इंडिया लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि सीईओ श्री. तरुण गर्ग म्हणाले, "ह्युंडाई बेयॉनचे लाँच भारतातील ह्युंडाईच्या पुढील गोल्डन प्रॉडक्ट सायकलचे शुभारंभाचे प्रतीक आहे. बेयॉन केवळ नवीन एसयूव्ही वेईकल नसून भारतातील ग्राहकांच्या महत्त्वाकांक्षांशी सुसंगत असणारी इंटेलिजंट, फ्युचर-रेडी मोबिलिटी सोल्यूशन्स देण्याच्या आमच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे. आमच्या 'इंटेलिजन्स दॅट मूव्हज' तत्त्वज्ञानावर आधारित बेयॉन दैनंदिन जीवन अधिक उत्साहवर्धक करणाऱ्या पद्धतीने अर्थपूर्ण नाविन्यता, प्रगत सुरक्षितता, सर्वोत्तम तंत्रज्ञान आणि आधुनिक डिझाइन एकत्र आणते.



डॉ. ईशानी बेंडाळे यांची जागतिक आरोग्य संघटनेच्या मुख्यालयाला भेट

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शिष्टमंडळात सहभाग; जागतिक आरोग्य क्षेत्रातील आयुर्वेदाच्या संभाव्य योगदानाची मांडणी

पुणे (दै. आरंभ पर्व)

आयुर्वेद अभ्यासक पुण्यातील डॉ. ईशानी बेंडाळे यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शिष्टमंडळाचा भाग म्हणून जिनिव्हा येथील जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) मुख्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांसोबत झालेल्या चर्चेत सहभाग घेतला. प्रतिजैविकांना प्रतिकारक्षमता या विषयावरील चर्चेत त्यांनी आयुर्वेदाची भूमिका यावर भाष्य केले. आयुर्वेदाचा जागतिक आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये कसा उपयोग होऊ शकतो, याचा शास्त्रीय आणि काटेकोर संशोधनाच्या माध्यमातून अभ्यास करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. जागतिक आयुर्वेद दिनाच्या पार्श्वभूमीवर आयुर्वेदाच्या जागतिक आरोग्यातील संभाव्य योगदानाच्या दृष्टीने या चर्चेला विशेष महत्त्व प्राप्त होते.



ऑक्सफर्ड मॉडेल युनायटेड नेशन्स इंडिया या उपक्रमात त्यांनी २०२४ आणि २०२५ मध्ये जागतिक आरोग्य संघटना समितीच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळली. २०२६ मध्ये त्यांनी महासंचालकपदासह संयुक्त राष्ट्रांच्या महिलांच्या स्थितीविषयक आयोगाच्या समितीच्या संचालकपदाची जबाबदारीही पार पाडली. आयुर्वेद, पुराव्यांवर आधारित आरोग्यसेवा, नॅनोमेडिसिन आणि जागतिक आरोग्य या क्षेत्रांतील कार्यासोबतच आंतरराष्ट्रीय घडामोडी, मुत्सद्देगिरी, विज्ञानविषयक संवाद आणि युवा नेतृत्व या क्षेत्रांतही डॉ. बेंडाळे योगदान देत आहेत.

जिनिव्हा दौऱ्यादरम्यान डॉ. बेंडाळे यांनी संयुक्त राष्ट्रांच्या जिनिव्हा येथील कार्यालयालाही भेट दिली. यावेळी ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या शिष्टमंडळासाठी आयोजित ज्ञानाधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेत त्यांनी विजेतेपद मिळविले. डॉ. बेंडाळे या ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून तेथून एमएस्सी पदवी पूर्ण करणाऱ्या पहिल्या आयुर्वेद चिकित्सक आहेत. तसेच, सध्या त्या ऑक्सफर्ड विद्यापीठात डीफिल (पीएचडी) पदवीचे संशोधन करणाऱ्या पहिल्या आयुर्वेद चिकित्सक ठरल्या आहेत. त्यांनी स्वान्सी विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयातून नॅनोमेडिसिन या विषयात एमएस्सी पदवी प्राप्त केली असून, ब्रिटिश सोसायटी फॉर नॅनोमेडिसिनच्या 'चॅम्पियन' म्हणूनही त्यांची निवड झाली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महिलांच्या स्थितीविषयक आयोगाच्या सीएसडब्ल्यू६८, सीएसडब्ल्यू६९ आणि सीएसडब्ल्यू७० या सलग तीन अधिवेशनांमध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. जगातील अग्रगण्य वादविवाद मंडळांपैकी एक असलेल्या ऑक्सफर्ड युनियनमध्ये त्या सध्या 'डायरेक्टर ऑफ एंगेजमेंट' म्हणून कार्यरत आहेत. नामवंत वक्ते आणि सार्वजनिक जीवनातील प्रतिष्ठित व्यक्तींशी संवाद साधणे, मुलाखती व चर्चांमध्ये योगदान देणे आणि संस्थेतील विचारमंथन व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्या काम करतात. ऑक्सफर्ड युनियनमध्ये त्यांनी विकिपीडियाचे संस्थापक जिमी वेल्स यांची मुलाखत घेतली. यावेळी विकिपीडियावरील आयुर्वेदासंदर्भातील माहिती आणि त्यामध्ये वापरण्यात आलेल्या शब्दप्रयोगांबाबतही दोघांमध्ये चर्चा झाली. या विषयावर अधिक सविस्तर चर्चा करण्यासाठी विकिपीडियाच्या वैज्ञानिक विषयांशी संबंधित तज्ज्ञाशी संपर्क करून देण्याची तयारी वेल्स यांनी दर्शवली.

दैनिक
आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व
सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती
आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये –
विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.

आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी



आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी
आजच संपर्क साधा!

संपर्क :
प्रतिक गंगणे
7276314142
8657865702
ई-मेल : aparvinfo@gmail.com

दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"